रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड मंगळवार । दि. २१ जुलै २०२६ । अंक ४५ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## बेस्टच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**मुंबई :** सायन-पनवेल महामार्गावरील मानखुर्द येथे सोमवारी (दि.२०) सकाळी एका भीषण अपघाताची घटना घडली. बेस्टची भरधाव बस थेट दुभाजकावर आदळल्याने, तिथे उभ्या असलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात बसचे चालक-वाहक आणि अन्य ५ प्रवासी असे एकूण ७ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास बेस्टची ५०१ क्रमांकाची •> पान ५ वर

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

**वर्धा :** वर्ध्यात समृद्धी महामार्गावर चॅनेल सहा जवळ भीषण अपघाताची घटना घडली. या अपघाता कारला भरधाव ट्रकने मागून धडक दिल्याने ६ जण जागीच मृत्यूमुखी पडले. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात मुलीच्या कॉलेजच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नागपूरचे कुटुंब गेले होते. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून नागपूरला परतत असताना त्यांच्या कारला ट्रकने मागून धडक दिली. अपघातानंतर कारने पेट घेतला. त्यात कारमधील चालकासह चौघांचा आणि ट्रकमधील चालक आणि क्लिनर यांचा मृत्यू झाला. •> पान ५ वर




# 'चलो संसद'वर लाठीचार्ज



- विद्यार्थ्यांच्या आवाजावर लाठीचा प्रहार, लोकशाहीवर हुकूमशाहीचा वार!
- कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलक पोहोचले संसद भवनाच्या परिसरात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**नीट पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अनेक विद्यार्थ्यांनी प्रचंड मानसिक ताण सहन केला, तर काहींनी टोकाचे पाऊल उचलून आत्महत्येच्या घटना समोर आल्या. अशा गंभीर प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, ही विद्यार्थ्यांची न्याय्य मागणी आहे. मात्र, उत्तर देण्याऐवजी सरकारने शांततामय आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, अश्रुधुराचा मारा आणि पोलिसी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. प्रश्न विचारणाऱ्या तरुणांना गुन्हेगारांप्रमाणे वागवून लोकशाहीचा नव्हे तर हुकूमशाहीचा चेहरा समोर आणला. विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके असायला हवी होती; पण आज त्यांच्या अंगावर लाठ्या बरसत आहेत. त्यामुळे हाच का मोदी सरकारचा 'अमृतकाळ'? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.**



### विद्यार्थ्यांना न्याय हवा, लाठी नाही

मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांनी पेपरफुटी करणाऱ्यांवर कारवाई करा, शिक्षण वाचवा, प्रधान राजीनामा द्या, अशा घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकण्याऐवजी त्यांना रोखण्यासाठी पोलीसबळाचा वापर करण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

### सीजेपीच्या तीन प्रमुख मागण्या

- सोनम वांगचुक यांची तातडीने सुटका.
- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा.
- आत्महत्या केलेल्या नीट परीक्षार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची आर्थिक मदत.

सोमवारी (दि.२०) जंतरमंतरवर जमा झालेल्या देशभरातील विद्यार्थ्यांनी आक्रमक पवित्रा घेत संसदकडे कूच केली. विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या. तर काही विद्यार्थ्यांवर चक्क लाठीचार्ज करुन त्यांना धक्काबुक्की केल्याचे प्रकारही घडले. त्यामुळे राजधानी दिल्लीतील वातावरण चांगलेच तापले असून अधिवेशनातही त्याचे पडसाद उमटल्याची माहिती समोर आली.

लाठीने विचार दडपता येत नाहीत. अश्रुधुराने सत्य झाकता येत नाही. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर संवाद •> पान ५ वर

## प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठ्या; हीच का लोकशाही?

### शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**



नीट पेपरफुटीमुळे राजधानीतील वातावरण तापले आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. पेपरफुटी करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी विद्यार्थ्यांवर लाठ्या चालविल्या जात आहेत. देशाच्या भविष्याला न्याय मागितल्याची शिक्षा दिली जात असेल, तर हा लोकशाहीचा नव्हे तर दडपशाहीचा मार्ग आहे. सरकारने तात्काळ विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. चलो संसद आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर •> पान ५ वर

### शेकाप विद्यार्थ्यांच्या पाठीशी

या आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रातही उमटतील, असा विश्वास व्यक्त करत चित्रलेखा पाटील म्हणाल्या, अभिजीत दिपके हा महाराष्ट्राच्या मातीतला मुलगा आहे. शाहू, फुले, आंबेडकर आणि सावित्रीबाई यांच्या विचारांची परंपरा असलेल्या या भूमीत अन्यायाविरोधात लढण्याची परंपरा आहे. तो हा लढा पुढे नेतील. शेकाप विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठाम उभा राहील आणि सरकारला जाब विचारत राहील.

## विचुंबे ग्रामपंचायतीत उलथापालथ

### भाजपच्या सरपंचांसह सदस्य अपात्र

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेलमधील विचुंबे ग्रुप ग्रामपंचायतीत मोठी राजकीय घडामोड घडली आहे. रायगड जिल्हाधिकारी न्यायालयाने भाजपचे सरपंच प्रमोद भिंगारकर आणि सदस्य अनिल भोईर यांना अपात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. प्रणाली भोईर यांनी दाखल केलेल्या दोन स्वतंत्र ग्रामपंचायत विवाद अर्जांवर सुनावणी करत जिल्हाधिकारी न्यायालयाने हा निर्णय दिल्याने विचुंबे ग्रामपंचायतीतील सत्तासमीकरण बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक ३२/२०२३ मध्ये प्रणाली भोईर यांनी भाजपचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या निवडीविरोधात आक्षेप घेतला होता. या प्रकरणात अर्जदाराचा दावा ग्राह्य धरत न्यायालयाने प्रमोद भिंगारकर यांना विचुंबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी निरर्ह (अपात्र) ठरविले आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक ३३/२०२३ मध्ये सदस्य अनिल भोईर यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अर्जही मंजूर करत त्यांनाही सदस्यपदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी •> पान ५ वर

#### काय आहे प्रकरण?

२०१३ मध्ये सर्वे क्रमांक ३८/० या सरकारी गुरुचरण जमिनीवरती बेकायदा इमारत बांधण्यात आली असून, या जमिनीवर ४२ सदनिका असलेले बेकायदा बांधकाम केले होते. त्यामुळे ही इमारत सरकारी जमिनीवर असतानाही जमिनीच्या पत्त्यावर दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करून सदनिका विकल्या गेल्या होत्या. याबाबत जिल्हा न्यायालयात सात वेळा सुनावणी करण्यात आली होती.

## लाखोंचा चरस जप्त

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

श्रीवर्धनमधील लाखोंचा चरस विकणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ३४ लाख ९८ हजार रुपयांच्या चरससह मोबाईल व दुचाकी जप्त करण्यात आली आहे. या कारवाईने चरसची तस्करी करणाऱ्यांना दणका मिळाला आहे. सादिक शेखदरे असे या आरोपीचे नाव आहे. हा श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडीमधील रहिवासी आहे. तो चरस विक्री करीत असल्याची माहिती श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक •> पान ५ वर

## दिबांच्या नामकरणाचा दिल्लीत लढा



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेला लढा आता थेट देशाची दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. विमानतळाच्या नामकरणाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे पाठविल्याचे सांगितले जात असताना, अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या भूमिपुत्रांनी दि.५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात नवी मुंबई, पनवेल, उरण, रायगड परिसरातील शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्र मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. विमानतळ उभारणीसाठी हजारो कुटुंबांनी आपल्या जमिनी दिल्या असून, त्या त्यागाचा •> पान ५ वर

## चिडीपाडा गावात पाणी टंचाई



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडूनही चिडीपाडा येथील गाव टंचाईच्या विळख्यात सापडला आहे. या ठिकाणी एका राजकीय व्यक्तीने जेसीबीने खड्डा खोदल्याने पाईपलाईन फुटल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांचे पाण्याविना हाल, अशी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी दिली.

### पाईपलाईन फुटल्याने नागरिकांचे हाल

अलिबाग-रेवस मार्गावरील चिडीपाडा येथे एका स्थानिक राजकीय व्यक्तीने स्वार्थासाठी किंवा स्टंटबाजीसाठी जेसीबी लावून खड्डा मुद्दाम मोठा केल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी स्थानिकांनी दिली. खड्डा खोदताना पिण्याच्या पाण्याची मुख्य पाईपलाईन फुटल्याने ऐन मुसळधार पावसात स्थानिक नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. समोर आलेल्या छायाचित्रांवरून स्पष्ट होते की, डांबरी रस्त्याच्या कडेला मोठमोठे डांबराचे खडक व मातीचे ढिगारे साचले होते. अपघाताची तीव्रता लक्षात घेता, तेथे सुरक्षेसाठी लाकडी काठ्या आणि कपडे बांधून तात्पुरता धोक्याचा इशारा उभारण्यात आला होता. या खड्ड्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून रस्ता खराब करणाऱ्या आणि पाणीपुरवठा खंडित •> पान ५ वर



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत १. श्री. गिरीश जगन्नाथ पाटील व २. अंजली गिरीश पाटील, रा. मु. नागाव, बदामी बीच जवळ, पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| देवघर, ता. अलिबाग | ४०३ | जिरायत २-९६-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण क्षेत्र २-९९-०० | ५.५० |

वर नमूद मिळकतीमधील १. श्री. गिरीश जगन्नाथ पाटील व २. अंजली गिरीश पाटील यांच्या सामाईक मालकीचे खाते क्र. ४७१, एकूण क्षेत्र ०-२०-१० हे. आर. आकार ०.०० रु. पै. ही जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २०/०७/२०२६

सही/-
**ॲड. वैभव वसंत पाटील**
रा. मु. नवेदरबेली पो. कुरुळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल प्रकाश ओंकारगिर गोसावी यांनी सदर मिळकतीचे मूळ मालकांकडून कायम स्वरुपात खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कागदपत्री पुराव्यासह लेखी हरकत उपस्थित करावी. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजण्यांत येईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील,**

| भूमापन नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे | कब्जेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ५३/२१ | ०-४५-००<br>पैकी<br>०-२२-५० | ०.४७ | प्रमोद पंढरीनाथ हातमोडे |

माणगांव
तारीख : २१/०७/२०२६

**ॲड. के. व्ही. धामणकर**
पत्ता : वैद्य हॉस्पीटलसमोर, कचेरी रोड,
माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड
मोबाईल नं. ९२७२४९३९६६

---

अर्जदारातर्फे वकील आर.डी. पाटील
अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ८९/२०२६
निशाणी क्र.

श्रीमती मंगला मंगेश सावंत, वगैरे ३ ... अर्जदार
विरुद्ध
श्री. हरेश मंगेश सावंत ... सामनेवाला

सर्व लोकांस सदरील जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ चे कायदेशीर पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील श्री. मंगेश यशवंत सावंत यांचे दि. २५/१२/२०२५ रोजी के.ई.एम. रूग्णालय, मुंबई येथे निधन झालेले असून त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १) श्रीमती मंगला मंगेश सावंत ही पत्नी, २) पुनम मंगेश सावंत (लग्नानंतरची सौ. पुनम प्रशांत पाटील व ३) सोनम मंगेश सावंत (लग्नानंतरची सौ. सोनम समीर दरेकर) या सख्ख्या मुली व सामनेवाला श्री. हरेश मंगेश सावंत हा कै. मंगेश यशवंत सावंत यांचा अनौरस मुलगा असे कायदेशीर वारस असून मौजे महान, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १८७/१, क्षेत्र २-०१-४० हे.आर पैकी १-६०-०० हे.आर. या जमीन मिळकतीच्या हक्कनोंदपत्रकी वरील अर्जदार व सामनेवाला यांची नावे नोंदविणेकामी आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेकरीता 'दि बॉम्बे रेग्युलेशन्स VIII १८२७' अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरील अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सदरील अर्जाकामी नेमलेल्या दिवशी म्हणजेच दि. १०/०८/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता या न्यायालयात स्वतः वा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपली हरकत/म्हणणे लेखी स्वरूपात दाखल करावे. दि. १०/८/२०२६ रोजी वा त्यापूर्वी वारस दाखला देणेबाबत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत नोंदविली नाही तर सदरील अर्जदारांनी विनंती केल्यानुसार त्यांना आवश्यक तो वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. २० माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**लिपीक** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर** **दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग-रायगड** **अलिबाग-रायगड**

---

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**
क्रमांक/आरटीएस/अपील क्र. ४८९/२०२५

१ श्री. विशाल वसंत पाटील
रा. हनुमान नगर, रोड नं. २८, वागळे आय. ई. गार्डन जवळ, ठाणे पश्चिम — अपिलार्थी
विरुद्ध
१ यशवंत रामचंद्र पाटील मयत तर्फे वारस
१/१ श्री. दिनेश यशवंत पाटील
२ श्रीम. मधुरा मधुकर मोकल
३ श्रीम. हिराबाई दामोदर कांबळे
४ श्रीम. कुसुम काशिनाथ मोकल
अ. क्र. १/१ व २ ते ४ सर्व रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड
५ श्रीम. सुशिला जगदीश कपाडीया
रा. माउंट युनिक, पेडर रोड, मुंबई - २६
६ श्री. अमोल जगदीश कपाडीया
रा. माउंट, युनिक पेडर रोड, मुंबई- २६ — उत्तरार्थी
७ श्री. गुनित चड्डा
८ श्री. माहीर शिव चड्डा
९ श्रीम. रानो चड्डा
अ. क्र. ७ ते ९ रा. १८१ अ मार्केट टॉवर्स, ए अन्ड बी, कफ परेड, मुंबई ४००००५
१० श्रीम. शिला शशिकांत बायकर
११ श्रीम. नमित शशिकांत बायकर
१२ श्रीम. नमिता सुशांत लोटलीकर
अ. क्र. १० ते १२ सर्व रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड
१३ श्री. हिरेन हसंराज छेडा
रा. ७०१, विपुर को. ऑप हो, सोसायटी, डॉ रमेश प्रधान मार्ग, राममुर्ती रोड, ठाणे पश्चिम-४०० ०६२
१४ तलाठी सजा आवास, ता. अलिबाग, जि. रायगड

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३९ क्षेत्र ००-३२-४० हे. आर. आकार १.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र. ५७/२०२४, दि. २६/०८/२०२५ मधील आदेशाविरुध्द या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला आईल यांची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०६/२०२६

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल विमल अनंत टिवरे यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायय खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे विद्यमान मालक नंदा बळीराम कदम वै. ८ यांची मौजे आंबेपुर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

मिळकतीचे वर्णन : मौजे आंबेपुर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. ११३, क्षेत्र ०-७५-०० हे. आर. पो. ख. ०-१०-०० हे.आर., एकुण ०-८५-०० हे. आर., आकार १५.१९ रू. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-०० हे.आर. इतके क्षेत्र जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणत्याही इसमाचा खरेदीखत नोंदणीकृत/अनोंदणीकृत, पतसंस्थेचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, बयाणापावती, तारण, भाडेपट्टा या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण होईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १८/०७/२०२६

सही/-
**ॲड. दर्शन यशवंत बैकर**
जिल्हा न्यायालय अलिबाग
मो.नं. ९२७०९४७४८४

---

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,**

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल :-collector.raigad@maharashtra.gov.in ई-मेल :-dydeoraigad@gmail.com

क्र/निवडणूक/कार्या-६(२)/डीईओ/ई-निविदा/कावी-०२/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

**ई-निविदा सुचना क्रमांक :- (२) २०२६-२०२७**

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील १५ मतदार मदत केंद्रासाठी कंत्राटी तत्वावर एकुण १५ डाटा एन्ट्री ऑपरेटर व निवडणूकीच्या कामासाठी आवश्यकतेनुसार लागणारे डाटा एंट्री ऑपरेटर पुरवठा करणेकरीता अनुभवी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ सेवा पुरवठादार कंपन्या /फर्म/एजन्सी यांच्याकडून ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा शासनाच्या www.mahatendrs.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

कामाचे नावः- रायगड जिल्हयातील ०७ विधानसभा मतदार संघामधील १५ तालुक्यातील मतदार मदत केंद्रांसाठी १५ कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा करणे बाबत.

| | |
|---|---|
| कामाची अंदाजित रक्कम | रू. ३६,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये-छत्तीस लाख फक्त.) |
| ई-निविदा फार्म शुल्क | रू. ५,७००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा रक्कम | रू.९५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पंच्यान्नव हजार फक्त.) |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १,०८,०००/-(रु. एक लाख आठ हजार रूपये फक्त.) |
| कामाचा कालावधी | १ वर्ष |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. २२.०७.२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. २२.०७.२०२६ सकाळी १०.०० वाजता पासून ते<br>दि. ०६.०८. २०२६ सायंकाळी ४.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक वेळ | दि. ०६.०८. २०२६ सायंकाळी ४.०० वाजता |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting ) दिनांक व वेळ व ठिकाण | दि. २७.०७.२०२६ सकाळी ११.०० वाजता (उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड-अलिबाग यांचे दालन) |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि ०७.०८.२०२६ सायंकाळी ४.३० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड- अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१. सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatendrs.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatendrs.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२. प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक, रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३. सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४. निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास II डीजीटल सिग्रेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५. सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६. निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
**(किशन ना. जावळे) भा.प्र.से**
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
रायगड-अलिबाग

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मीटर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मंगेश बाबुराव खैरनार | ३/४/अ<br>३/४/अ | ४<br>५ | ३२०.००<br>३१०.०० | ३२=००<br>३१=०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- २१/७/२६

**महेंद्र नारायण बडेकर**
पत्ता - मु.पोस्ट किरवली
ता. कर्जत जि. रायगड
मो ९८५००५४७१८

---

दिनांक : ०७/०७/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. खिमराज जयंतीलाल जैन व सौ. संगिता खिमराज जैन यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरुड | ३५७ | एकूण क्षेत्र ८३-००-०० | ८३०.०० |

वर नमुद मिळकतीमधील श्री. खिमराज जयंतीलाल जैन व सौ. संगिता खिमराज जैन यांचा असलेला अविभक्त हिस्सा ही मिळकत.

दिनांक :- २०/०७/२०२६

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग - रायगड
मोबा. नं. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक १. उमाबाई गणपत कोळंबे, २. शांताबाई महादू मिणमिणे, ३. अमृता काशिनाथ रसाळ, ४. किसन काशिनाथ रसाळ, ५. जनार्दन काशिनाथ रसाळ, ६. बळीराम काशिनाथ रसाळ, ७. भिका काशिनाथ रसाळ, ८. रमेश काशिनाथ रसाळ, राहणार मौजे धोत्रे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे धोत्रे, ता.कर्जत, जि.रायगड | २/२ | ०.६९.०० | ०.४२ |

वरील वर्णनाच्या शेतीजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. २१.०७.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता. कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस
### मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो. माणगाव यांचे न्यायालयात

ज.नो.प्रस्ताव क्र.१८६/२०२६

१. शमीम इस्माईल जालगांवकर,
रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी शमीम इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

त्यांनी शमीम इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ११/०७/१९८७ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

शमीम इस्माईल जालगांवकर, रा.निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, निजामपूर यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास शमीम इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ११/०७/१९८७ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १४/०७/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार माणगाव**

## जाहीर नोटीस
### मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगाव यांचे न्यायालयात

ज.नों.प्रस्ताव क्र.१८६/२०२६

१. शगुफ्ता इस्माईल जालगांवकर,
रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी शगुफ्ता इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०६/११/१९८८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

त्यांनी शगुफ्ता इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०६/११/१९८८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

शगुफ्ता इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, निजामपूर यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास शगुफ्ता इस्माईल जालगांवकर, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०६/११/१९८८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १४/०७/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार माणगाव**

---

## जाहीर नोटीस
### मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो.. माणगाव यांचे न्यायालयात

ज.नों.प्रस्ताव क्र.३३४/२०२६

१. मोहम्मद असगर युनूस खेरटकर,
रा. साई, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
साई, ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत साई, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी मोहम्मद असगर युनूस खेरटकर, रा. साई, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १५/०६/१९५७ रोजी मौजे साई, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

त्यांनी मोहम्मद असगर युनूस खेरटकर, रा. साई, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १५/०६/१९५७ रोजी मौजे साई, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप साई, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, साई, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

मोहम्मद असगर युनूस खेरटकर, रा. साई, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, साई यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मोहम्मद असगर युनूस खेरटकर, रा. साई, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १५/०६/१९५७ रोजी मौजे साई, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १७/०७/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार माणगाव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सोनाली अमित राजपुत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह क्वाड्रा लीगल वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-वैजाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९९, एकूण क्षेत्र ००-२१-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ५.००/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/०७/२०२६

**क्वाड्रा लीगल**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर निवासी सदनिकेचे विद्यमान मालक सौ. प्रतिभा जनार्दन बारसकर, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे चेंढरे, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड येथील व ग्रामपंचायत चेंढरे, हद्दीतील सर्व्हे नं. ६३/१ब, बिनशेती प्लॉट नं. १, क्षेत्र ६७६.०० चौ.मी., या मिळकतीवर बांधण्यात आलेली नियोजित ''प्रभात नगर को. ऑप. हौसिंग सोसायटी'' मधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक ४, क्षेत्र ६७६ चौ. फुट बिल्टअप (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ८४८/४) हि निवासी सदनिकेबाबत.**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०/०७/२०२६

**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा. बुरुमखाण, वरसोली,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्री. रजनिकांत हरिभाऊ पेके, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर निवासी सदनिकेच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या निवासी सदनिकेचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे चेंढरे, अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड येथील व ग्रामपंचायत चेंढरे, हद्दीतील सर्व्हे नं.४, हिस्सा नं.१ अ पैकी, बिनशेती प्लॉट नं.३.४ क्षेत्र ७५८.५० चौ.मी., आकार १५.१७ रु. पैसे, ह्या बिनशेती प्लॉटवर विकसीत केलेल्या ममता सहकारी गृहनिर्माण संस्था ममता नगर नागडोंगरी चेंढरे ह्या इमारतीमधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३, क्षेत्र ४१५ चौ. फुट बिल्टअप चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १०१६/३, ए विंग हि निवासी सदनिका या साठेकराराचा विषय आहे.**

तरी वरील निवासी सदनिकेच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०/०७/२०२६

**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा.बुरुमखाण, वरसोली,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

# मांडवा जेट्टीवरील अनधिकृत बांधकाम पाडणार?

## पर्यावरणविरोधी शॉपिंग मॉल, रेस्टॉरंट आणि बारवर होणार कारवाई

## प्रशासकीय यंत्रणा ॲक्शन मोडवर; भूमाफियांमध्ये खळबळ

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

**मांडवा जेट्टीवरील गेल्या आठ वर्षांपासून रखडलेल्या पर्यावरणविरोधी अनधिकृत बांधकामांवर अखेर प्रशासनाचा हातोडा पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. किनारी नियंत्रण क्षेत्र (सीआरझेड) नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या अनधिकृत शॉपिंग मॉल, रेस्टॉरंट आणि कथित बेकायदेशीर बारवर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली असून, महसूल विभागाने हालचालींना वेग दिला आहे. त्यामुळे संबंधित बांधकामधारक आणि भूमाफियांमध्ये खळबळ उडाली असून, प्रशासकीय यंत्रणा आता ॲक्शन मोडवर आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी दिली.**




पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेल्या मांडवा जेट्टी परिसरात पर्यावरणविरोधी अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याचा आरोप अनेक वर्षांपासून होत होता. याप्रकरणी तक्रारी दाखल झाल्यानंतर महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) ने २८ जुलै २०१७ रोजी झालेल्या बैठकीत पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत ही अनधिकृत बांधकामे तातडीने हटविण्याचे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला दिले होते. मात्र, तब्बल आठ वर्षे उलटूनही प्रत्यक्ष कारवाई झाली नाही. उलट, संवेदनशील सीआरझेड क्षेत्रात अनधिकृत व्यावसायिक उपक्रम सुरू राहिल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत होती.

दरम्यान, १५ मे २०२६ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या एमसीझेडएमए सेलने जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर प्रशासनाने हालचाली सुरू करत अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी १६ जुलै रोजी संयुक्त स्थळपाहणी, अचूक मोजमाप तसेच व्हिडिओ चित्रीकरणासह पंचनामा करण्याचे आदेश दिले.

या आदेशानुसार महसूल, नगररचना आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी पूर्ण केली असून, संपूर्ण अहवाल येत्या चार ते पाच दिवसांत वरिष्ठांकडे सादर केला जाणार असल्याची माहिती मिळाली आहे. या घडामोडींमुळे सीआरझेड नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, पर्यावरणविरोधी अनधिकृत बांधकामांवर अखेर प्रशासकीय हातोडा पडणार का, याकडे आता संपूर्ण रायगडचे लक्ष लागले आहे.

### आठ वर्षांनंतर चालणार हातोडा?

मांडवा जेट्टी परिसरातील ‘बीच बॉक्स’ नावाने सुरु असलेले शॉपिंग मॉल, रेस्टॉरंट आणि इतर बांधकामे किनारी नियंत्रण क्षेत्र (सीआरझेड) नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी अनेक वर्षांपासून तक्रारी होत असतानाच महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने (एमसीझेडएमए) २०१७ मध्येच ही अनधिकृत बांधकामे हटविण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, तब्बल आठ वर्षे कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. आता या प्रकरणाची गंभीर दखल घेत अलिबागचे तहसीलदार, सहाय्यक संचालक (नगररचना), उपअधीक्षक भूमी अभिलेख, सारळचे मंडळ अधिकारी आणि धोकवडे सजाचे तलाठी यांना संयुक्त पाहणी, मोजमाप व आवश्यक कार्यवाहीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांच्या अहवालावरुन कारवाई निश्चित होणार आहे.

# पाणीप्रश्नावर सभागृह तापले

| पेण | विशेष प्रतिनिधी |



**● पेण नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत तू-तू, मै-मै**

पेण नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील दूषित व गाळयुक्त पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून सत्ताधारी सदस्यांमध्येच जोरदार शाब्दिक चकमक झाली. शहरात अनेक दिवसांपासून लालसर व गाळयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, याच मुद्द्यावर सभागृहात गदारोळ निर्माण झाला.

पहिल्याच पावसात पेण नगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी उघड झाल्याचा आरोप सदस्यांनी केला. शहरातील सर्व भागांत लाल रंगाचे, गाळयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांना पोट व घशाच्या आजारांचा सामना करावा लागत असल्याची बाब सभागृहात उपस्थित करण्यात आली. कोट्यवधी रुपयांची विकासकामे होत असताना नागरिकांची मूलभूत गरज असलेला शुद्ध पाणीपुरवठा करण्यात नगरपालिका अपयशी ठरत असल्याची टीका करण्यात आली. सभेदरम्यान नगराध्यक्षांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आमदार रवीशेठ पाटील प्रयत्नशील असल्याचे सांगितले. मात्र, अशुद्ध पाणीपुरवठ्याच्या मूळ प्रश्नावर ठोस भूमिका किंवा उपाययोजना न मांडल्याने सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतला. त्यामुळे सभागृहातील वातावरण चांगलेच तापले.

दरम्यान, बांधकाम सभापती स्मिता पेणकर यांनी अधिकाऱ्यांकडून आपल्या आदेशांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याची खंत व्यक्त केली. आपल्या पत्रांनाही केराची टोपली दाखविली जात असल्याचा आरोप त्यांनी सभागृहात केला.

सत्ताधारी नगरसेविका पल्लवी कालेकर यांनी या संदर्भात लेखी तक्रार सादर केली. तसेच ज्येष्ठ नगरसेविका मालती म्हात्रे आणि सभापती कलावती पाटील यांनीही विकासकामे रखडण्यामागे अधिकारी वर्ग जबाबदार असल्याचा आरोप करत नाराजी व्यक्त केली.

लोकप्रतिनिधींमधील अंतर्गत नाराजीचे पडसाद सभागृहात उमटले असून, त्याचा फटका अधिकारी वर्गाला बसल्याचे चित्र पाहायला मिळाले. नगराध्यक्षांनीही अनेक बाबींवर अधिकाऱ्यांना धारेवर धरले. मात्र, सभेच्या अखेरीस शहरातील अशुद्ध व गाळयुक्त पाणीपुरवठ्याबाबत ना नगराध्यक्षांकडून ठोस उत्तर मिळाले, ना अधिकारी वर्गाकडून प्रभावी उपाययोजना जाहीर करण्यात आली. त्यामुळे नागरिकांच्या जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न कायमच प्रलंबित राहिल्याने गरमागरम वातावरणात सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

# सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला कर्जतमध्ये पाठिंबा

| नेरळ/वेणगाव | प्रतिनिधी |



**● विद्यार्थी, पालकांचा मोर्चा**

दिल्लीतील जंतरमंतरवर ज्येष्ठ शास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सोमवारी कर्जतमध्ये विद्यार्थी, पालक आणि विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी मोर्चा काढत निदर्शने केली. विशेषतः नीट परीक्षेला बसलेले अनेक विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले होते.

कर्जत येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मोर्चा तहसीलदार कार्यालय असलेल्या प्रशासकीय भवनाकडे रवाना झाला. मात्र, पोलिसांनी प्रशासकीय भवनाबाहेरच मोर्चा अडविला. यानंतर आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींकडे पाठविले.

यावेळी नीट पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च स्तरावर निष्पक्ष चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी, शिक्षण व्यवस्था पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त करावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या.

आंदोलनात समन्वयक ॲड. कैलास मोरे, ॲड. राजेंद्र निगुडकर, सचिन भालेराव, माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड, राजाभाऊ कोठारी, ॲड. क्रांती अभंगे, ॲड. सोनाली लाड, रमेश कदम, संतोष पेरणे, जितेंद्र जाधव यांच्यासह विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेना (ठाकरे) तालुकाप्रमुख बाजीराव दळवी, माजी सरपंच आरती भोईर, वंचितचे धर्मेंद्र मोरे आणि सचिन गायकवाड यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

# टँकरमधील तेलाची चोरी

**पनवेल :** मुंबईतील वाडीबंदर न्हावाशेवा येथे ड्रिल ऑइल येथून पोहोचविण्याचे काम करताना टँकरमधील या तेलाची चोरी करणाऱ्या टोळीवर उलवे पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६८ लाख ७१ हजार ५०० रुपये किमतीच्या ड्रील ऑइलसह सहा टँकर जप्त केले आहेत. तसेच सहा टँकरचालक, तेल विकत घेणारा व्यापारी अशा एकूण सात आरोपींना अटक केली आहे. वाहतूक व्यावसायिक सरफराज अहमद अफताब शेख (४७) यांना मुंबईतील वाडीबंदर ते न्हावा सप्लाय बेस येथे ड्रील ऑइल पोहोचविण्याचे काम मिळाले होते.

# महसूल दप्तरी वारस नोंदीच्या प्रक्रियेत दिरंगाई

## पूर्वीची पद्धत लागू करण्याची मागणी

| आगरदांडा | प्रतिनिधी |

महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजस्व अभियानांतर्गत वारस नोंद करण्याच्या विद्यमान प्रक्रियेमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर दिरंगाईचा सामना करावा लागत असल्याने पूर्वीप्रमाणेच स्थानिक स्तरावर वारस पंचनामा करून नोंदी करण्याची मागणी पुढे आली आहे. यासंदर्भात मुरुड येथील ज्येष्ठ समाजसेवक उदय हरिश्चंद्र चौलकर यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री तसेच स्थानिक आमदारांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी मयत खातेदाराच्या गावातील तलाठी आणि महसूल कर्मचारी प्रत्यक्ष घरी जाऊन पंचनामा करून वारस नोंद प्रक्रिया पूर्ण करत असत. त्यामुळे सातबारा उताऱ्यावर वारसांची नोंद अल्पावधीत होत होती. मात्र, सध्याच्या बदललेल्या प्रक्रियेनुसार एखाद्या व्यक्तीचा मृत्यू परगावी झाला असल्यास त्या ठिकाणच्या महसूल कार्यालयातून स्वतंत्र पंचनामा करून अहवाल संबंधित गावाच्या महसूल कार्यालयाकडे पाठवावा लागतो. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ ठरत आहे. यामुळे वारसांना विविध महसूल कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागत असून, कागदपत्रांची देवाणघेवाण आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे वारस नोंदीसाठी अनेकदा वर्षभराहून अधिक कालावधी लागत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करत नागरिकांना वारस नोंदीसाठी सतत पाठपुरावा करावा लागत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.

मयत व्यक्तीचा अधिकृत मृत्यू दाखला उपलब्ध असताना पुन्हा स्वतंत्र पंचनामा करण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करत, नागरिकांच्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे पूर्वीप्रमाणे स्थानिक महसूल अधिकाऱ्यांकडून वारस नोंद करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ‘त्या’ बार्ज मालकावर अखेर गुन्हा दाखल

| म्हसळा | प्रतिनिधी |

**● आंबेत-म्हाप्रळ पूल धडकप्रकरणी कारवाई**



सावित्री खाडीवरील आंबेत-म्हाप्रळ पुलाला धडक देऊन वाहतुकीत अडथळा निर्माण करणाऱ्या बार्ज मालकाविरोधात अखेर मंडणगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा करणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे रायगड जिल्हा संघटक तथा श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने कारवाईला गती दिली. १७ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, १८ जुलै रोजी संबंधित बार्जचा पंचनामाही पूर्ण करण्यात आला.

पुलाचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी १६ जुलै रोजी म्हसळा येथे आमरण उपोषण करण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र, विभागाकडून तक्रार दाखल होऊनही सुरुवातीला गुन्हा नोंदविण्यात विलंब झाल्याने धनसे यांनी २८ जुलैपर्यंत कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर प्रशासनाने तात्काळ हालचाली करत गुन्हा दाखल केला आणि बार्जचा पंचनामा पूर्ण केला. या कारवाईनंतर रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याप्रकरणी कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी अझहर धनसे यांनी केली असून, सावित्री नदीपात्रात नियमबाह्य व बेजबाबदार काम करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही लढा सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यावेळी धनसे यांनी या जनहिताच्या लढ्यात सहकार्य करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागासह पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे आणि स्थानिक नागरिकांचे आभार मानले.



# ‘आदिवासी भवन अस्मितेचे प्रतीक’

| नेरळ | प्रतिनिधी |

आदिवासी भवन कशेळे येथे उभारले जात आहे. हे भवन सामाजिक उन्नतीचे केंद्र तर बनेलच; परंतु खऱ्या अर्थाने आदिवासी अस्मितेचे प्रतीक म्हणून उभे राहील हा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला. कर्जत तालुका आदिवासी समाज संघटनेच्या वार्षिक गुणगौरव सोहळ्यात आमदार बोलत होते.

आदिवासी समाज संघटना कर्जत तालुका यांच्यावतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थी तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदिवासी समाज बांधवांचा सन्मान सोहळा कशेळे येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, जि.प. सदस्य वर्षा दोरे, पंचायत समिती अक्षय तिटकारे, कविता पादिर, भास्कर देसले, आदिवासी नेते मंगल केवारी, कांता पादीर आदी उपस्थित होते.

## ३६ तासांत दुचाकी चोर जेरबंद

## सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपीला अटक

# रेवदंडा पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खानाव येथून चोरीस गेलेली दुचाकी अवघ्या ३६ तासांत शोधून काढत आरोपीला अटक करण्यात रेवदंडा पोलिसांना यश आले आहे. चोरीस गेलेली टीव्हीएस एनटॉर्क मोटारसायकलही पोलिसांनी जप्त केली आहे.

खानाव येथील जितेश भास्कर पाटील (३३) यांनी १६ जुलै रोजी रात्री आपली टीव्हीएस एनटॉर्क १२५ सीसी (एमएच-०६-सीएस-८७४५) ही दुचाकी घराच्या अंगणात उभी केली होती. १७ जुलै रोजी पहाटे अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली.



याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या देखरेखीखाली पीएसआय अंगज यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तपासात आरोपी चोरीची दुचाकी घेऊन पेणपनवेल मार्गे जात असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर महामार्ग वाहतूक पोलिसांच्यामदतीनेपळस्पेपरिसरात नाकाबंदी करण्यात आली. या कारवाईत पोलीस कर्मचारी मनीष ठाकूर, तुषार पारवे, केदारनाथ साखरकर आणि समीर धुरी यांनी आरोपी शंकर मंगल गिलवा (३३, रा. चंपागड, ता. राऊरकेला, जि. सुंदरगड, ओडिशा) याला चोरीच्या मोटारसायकलीसह ताब्यात घेतले.

अवघ्या ३६ तासांत गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक करण्यात आल्याने रेवदंडा पोलिसांच्या तांत्रिक तपास आणि तत्पर कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार मनीष ठाकूर करीत आहेत.

# सफाई कामगाराचे घर फोडले

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल पालिकेत कार्यरत एका सफाई कामगाराचे बंद घर फोडून चोरट्यांनी तब्बल आठ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना तळोजा येथे घडली आहे. या घरफोडीमुळे परिसरात नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संदीप पाटील हे तळोजा येथे राहण्यास असून, पनवेल महापालिकेत सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. संदीप पाटील हे आपल्या घराला टाळे लावून रात्रपाळीवर कामाला गेले होते.

# निवडक

## माणगावात ‘अजित हरित अभियान’

**माणगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवार, दि. २२ जुलै रोजी माणगाव तालुक्यात अजित हरित अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते दुपारी २.३० वाजता जावळी येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा तसेच तीर्थस्वरूप नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष माणगाव, ग्रुप ग्रामपंचायत लोणशी आणि गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जावळी यांच्या वतीने करण्यात आले आहे. स्व. अजितदादा पवार यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यातून देशभरात वेगळी ओळख निर्माण केली होती. पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीबाबत त्यांना विशेष आस्था होती. त्यांची ही पर्यावरणप्रेमी विचारधारा समाजापर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या स्मृतींना वृक्षारोपणाच्या माध्यमातून अभिवादन व्हावे, या उद्देशाने अजित हरित अभियान राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.



## फूटपाथवर दुचाकींचे अनधिकृत पार्किंग

**नवीन पनवेल :** नवीन पनवेल शहरातील अभ्युदय बँकेजवळील परिसरात नवीन रेल्वे पूल सुरू झाल्यापासून नीलकंठ सोसायटी परिसरातील फुटपाथवर बाहेरून बँकेजवळ येणाऱ्या नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात दुचाकी पार्किंग केली जात असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. त्यामुळे संध्याकाळच्या वेळेत वाहतूक कोंडी निर्माण होत असून, स्थानिक रहिवाशांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याचबरोबर रस्त्याच्या कडेलाही मोठ्या प्रमाणात वाहन पार्किंग होत असल्याने वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. सेक्टर १८ मधील रोड क्रमांक ३ वरील फुटपाथवरही अनधिकृत पार्किंग सुरू झाल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध राहात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनधिकृत वाहन पार्किंगची ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून फुटपाथवरील अनधिकृत पार्किंग हटवावे, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना सुरक्षितपणे पायी चालता येईल यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढावा आणि पार्किंग व्यवस्था करावी, अशी मागणी आदित्य जानोरकर, सचिव, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस युवक (शरदचंद्र पवार पक्ष) यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## अवैध दारूविक्रीवर कारवाई होणार

**● राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवारांचा इशारा**

**पनवेल :** रायगड जिल्ह्याचे नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवार यांनी पदभार स्वीकारताच अवैध दारूविक्री, गावठी दारूच्या भट्ट्या आणि बेकायदेशीर मद्य वाहतुकीविरोधात कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. ‘‘अवैध धंदे करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही,’’ असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. छत्रपती संभाजीनगर येथे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सॉफ्टवेअर अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. त्यानंतर शासकीय सेवेत प्रवेश करून त्यांनी विविध ठिकाणी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. हिंगोली येथे कार्यरत असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूविरोधात विशेष मोहिमा राबविण्यात आल्या. २३ ते २५ मे २०२६ या कालावधीत झालेल्या विशेष कारवाईत २१ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. या कारवाईदरम्यान गावठी दारूच्या भट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या, अवैध दारू वाहतुकीसाठी वापरली जाणारी वाहने जप्त करण्यात आली आणि सुमारे १.६५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. रायगड जिल्ह्याबाबत बोलताना आदित्य पवार म्हणाले की, जिल्ह्यातील गावठी दारूच्या भट्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल. तसेच दिव-दमनमधून होणारी अवैध दारूची वाहतूक आणि काही बार-रेस्टॉरंटमधून होत असलेल्या छुप्या मद्यविक्रीवरही कठोर कारवाई केली जाईल. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता ठेवून सर्व तालुकास्तरीय कार्यालयांच्या कामाचा सातत्याने आढावा घेत नागरिक आणि परवानाधारक व्यावसायिकांची कामे वेळेत मार्गी लावण्यावर भर देणार असल्याचेही आदित्य पवार यांनी स्पष्ट केले.



## कोळीवाड्यात शिरले गाढी नदीचे पाणी

**● नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण**

**खांदा कॉलनी :** काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने शनिवारी मध्यरात्रीपासून पनवेल परिसरात जोरदार पुनरागमन केले. रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे गाढी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. परिणामी, नदीकाठावरील कोळीवाडा परिसरात पुन्हा पाणी शिरल्याने नागरिकांची धावपळ उडाली.

अचानक वाढलेल्या पाण्यामुळे अनेक घरांच्या अंगणात आणि अंतर्गत रस्त्यांवर पाणी साचले. खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी घरातील साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यास सुरुवात केली. दरवर्षी पावसाळ्यात सखल भाग असल्याने कोळीवाडा परिसराला पुराचा फटका बसत असून, यंदाही तीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही तासांतही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून, नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सतर्क राहावे आणि अनावश्यकपणे नदीकाठावर जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# याचे नाव काव्यगत न्याय

विश्वचषक फुटबॉल नावाचा खेळाचा महाकुंभ रविवारी अमेरिकेत समाप्त झाला. ही स्पर्धा भयंकर चुरशीची झाली. अंतिम सामना दिलखेचक झाला. अर्जेंटिना आणि त्याचा स्टार खेळाडू मेस्सी याच्याभोवती भयंकर वलय निर्माण करून ठेवण्यात आले होते. त्यामुळे ते अंतिम सामन्यात आल्यानंतर जणू जिंकलेच असे अनेकांना वाटत होते. पण तिथे स्पेनने जबरदस्त सांघिक खेळ केला. अर्जेंटिनाला जवळपास गोलची एकही संधी मिळू दिली नाही. अर्जेंटिनाला गोलपोस्टच्या दिशेने संपूर्ण सामन्यात केवळ दोन शॉट्स मारता आले. तर स्पेनने तब्बल वीसवेळा अर्जेंटिनाच्या बाजूला धडक दिली होती. अगदी सुरुवातीला स्पेनचा स्टार खेळाडू यमाल याचे दोन गोल तर होता होता वाचले. मेस्सीवर अवलंबून असलेल्या संघाला संघभावनेने खेळणाऱ्यांनी मात दिली. स्पेनने अनेक अर्थाने आदर्श खेळ केला. संपूर्ण स्पर्धेत त्यांच्याविरुध्द केवळ एकाच संघाला एकच गोल करता आला. यावरून त्यांचा बचाव किती भक्कम होता याची कल्पना यावी. गोलचा बचाव ही केवळ गोलकीपरची जबाबदारी नसते. इतर खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांना गोलपर्यंत पोचू न देणे व पोचले तरी रोखणे ही खरी गंमत असते. ती कामगिरी स्पेनने चोख बजावली. फुटबॉल हा मैदानी खेळ असला तरी स्पेनचा खेळ पाहताना आपण बुध्दिबळाचा सामना पाहतो आहोत असे वाटत होते. चेंडूचा ताबा ते सदैव आपल्यापाशी ठेवत होते. छोटे छोटे पासेस देऊन समोरच्या संघाला सतत चकवत होते. शिवाय अचानक गिअर बदलून समोरच्यांवर दबावही वाढवत होते. स्पेनकडे यमाल सोडला तर रोनाल्डो, एम्बापे किंवा मेस्सी यांच्यासारखा स्टार खेळाडू नाही. पण त्यांची संघभावना इतर कोणाहीपेक्षा सरस होती. शिवाय इतर अनेक संघ प्रतिस्पर्धी खेळाडूला पाडणे, जखमी करणे असे प्रकार करतात. स्पेनने तसे प्रकार केल्याचे दिसले नाही. अगदी अंतिम लढतीतही त्यांच्या बाजूने असा संघर्ष झाला नाही. आजच्या काळात हे खरोखरच दुर्मिळ दृश्य होते. अशा पाडापाडीतून फाऊल वा प्रतिस्पर्ध्याला पेनल्टी मिळू न देणे हे त्यांना चांगले साधले.

## शिस्तबध्द खेळाचा विजय

स्पेनने २०२४ चा युरो कपही जिंकला होता. त्यापाठोपाठ त्यांनी विश्वचषक जिंकून आपण जगातील सर्वोत्कृष्ट संघ आहोत हे दाखवून दिले. अमेरिकेत झालेली ही स्पर्धा अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण होती. अमेरिकेमध्ये फुटबॉल फार लोकप्रिय नाही. तो खरा युरोप आणि लॅटिन अमेरिकी देशांचा खेळ आहे. ब्राझील, अर्जेंटिना किंवा जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड हे त्यातले दादा आहेत. युरोपातील बहुतांश क्लबसमध्ये याच देशांच्या खेळाडूंचा भरणा असतो. अमेरिकेत फुटबॉल लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने तिथे ही स्पर्धा झाली. शिवाय तिचा विस्तारही करण्यात आला. पात्रता फेरीत आजवर ३२ संघ उतरत असत. यंदा ४८ संघांना संधी देण्यात आली. त्यामुळे कांगो, केप व्हर्दे, बोस्निया अशा छोट्या देशांना संधी मिळाली. जपान, कोरिया अशा संघांनी चांगली चमक दाखवली. इजिप्तविरुध्द तर मेस्सीचा अर्जेंटिना हरता हरता वाचला. युध्दाच्या खाईत असूनही इराणचा संघ पात्र ठरला व अमेरिकेमध्ये खेळला. त्यांच्या खेळाडूंना केवळ सामन्यापुरता व्हिसा देऊन ट्रम्प यांनी क्षुद्रपणा केलाच. पण तरीही त्या संघाने सर्वांची मने जिंकली. पुढच्या विश्वचषकात म्हणजे २०३० मध्ये ६४ संघ खेळवण्याचा विचार चालू आहे. तसे झाले तर भारताचाही यात कदाचित समावेश होऊ शकेल. भारतात हा खेळ हळूहळू क्रिकेटची जागा घेऊ लागला आहे. आयपीएलच्या अतिक्रिकेटमुळे तरुणांचा रस कमी होत चालला आहे. त्यातच भारतीय खेळपट्ट्यांवर धावांची बरसात करणारे लोक इंग्लंडमध्ये गेले की कसे ढेपाळतात हे सध्या दिसते आहेच. त्यामुळे आयपीएल हे मसाला क्रिकेट होऊ लागले आहे. त्या मानाने फुटबॉल हा अधिक रसरशीत व कस पाहणारा खेळ आहे. कालच्या विश्वचषकाचे सामने मध्यरात्री उशिरा असूनही कोट्यवधी भारतीयांनी ते पाहिले. बाजारातल्या कंपन्या व जाहिरातवाल्यांसाठी ही चांगली संधी आहे. त्यामुळे इथून पुढे भारतात फुटबॉल वाढणार हे नक्की. या विश्वचषकाने त्यात मोठी भर घातली. युरोपमध्ये इंग्लंडसारखे संघ दांडगाई व मारामाऱ्यांचा खेळ करण्यासाठी प्रसिध्द आहेत. ते पराभूत झाले आणि शिस्तबध्द, सांघिक आणि बुध्दीच्या आधारे खेळणारा स्पेन विजयी झाला हा एक काव्यगत न्याय म्हणावा लागेल. फुटबॉलच्या भविष्यासाठी ही चांगली बाब आहे. हा खेळ असाच पुढे जात राहो.

### स्वत्व दाखवले

डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिकेच्या भूमीवर स्पेनने फुटबॉलचा विश्वचषक जिंकणे हाही आणखी एका प्रकारचा काव्यगत न्याय आहे. स्पेनमध्ये डाव्या पार्टीचे सरकार आहे. तिचा अमेरिकी दादागिरीला विरोध आहे. इराण युध्दामध्ये अमेरिकेची री ओढण्यास स्पेनने नकार दिला होता. वास्तविक युरोपमध्ये असल्याने स्पेन हा नाटोचा सदस्य देश आहे. नाटो ही अमेरिकेने दुसऱ्या महायुध्दानंतर स्थापन केलेली जागतिक लष्करी संघटना आहे. रशियाला तोंड देण्याच्या नावाखाली अमेरिकेने उभे केलेले हे मोठे कारस्थानी बाळ आहे. अमेरिका आणि युरोपचे देश हे याचे सदस्य आहेत. आखाती देश, आफ्रिका आणि आशियामध्ये रशियाला शह देण्यासाठी नाटोवाले एकत्र लढाया करीत. जसे की सद्दाम हुसेनच्या इराकविरुध्द केलेली कारवाई नाटोची होती. पण इराण युध्दात सामील व्हायला ब्रिटन, फ्रान्स यांनी नकार दिला. स्पेनने आपल्या देशाचे विमानतळ अमेरिकी लष्करी विमानांना वापरू देणार नाही अशी भूमिका घेतली. नाटो संघटनेचा सदस्य असूनही स्पेनने हे केल्याने ट्रम्प यांनी शिव्यागाळी केली. स्पेनसोबतचे व्यापारी करार बंद करून टाकले. स्पेनशी संबंध तोडण्याची धमकी दिली. तेथील डाव्या सरकारविरुध्द उठाव करण्यासाठी अमेरिकेने मदत सुरू केली. तरीही स्पेनचे सरकार बधले नाही. इराणशी अमेरिकेचे थेट युध्द सुरू होते. शिवाय तो अमेरिकी जनतेच्या दृष्टीने इराण खलनायक आहे. स्पेनचे तसे नाही. त्यामुळे स्पेनने अमेरिकेच्या विरोधात भूमिका घेतली असली तरी त्याच्या खेळाडूंना पासपोर्ट नाकारणे वगैरे करणे ट्रम्प यांना शक्य नव्हते. दुसरे म्हणजे अमेरिकेत इंग्रजीच्या बरोबरीने बोलली जाणारी दुसरी भाषा स्पॅनिश आहे. ही बोलणारे बहुतांश लोक लॅटिन अमेरिकेतील असले तरी त्यांना स्पेनविषयी ममत्व आहेच. दुसरे म्हणजे इराण युध्दावरून आता खुद्द अमेरिकेतही ट्रम्पच्या विरोधात मोठे वातावरण आहे. त्यामुळे स्पेनने हवाईदलाचे तळ वापरू न देण्याला अमेरिकी लोकांचा अप्रत्यक्ष पाठिंबाच असेल. त्याहूनही महत्वाचे म्हणजे स्पेनच्या फुटबॉल संघाची मैदानावरची कामगिरी इतकी दमदार आहे की त्याला डावलणे शक्य नव्हते. फुटबॉल महासंघवाले ट्रम्प यांच्या नादाने वाहवत गेले. एका सामन्यामध्ये अमेरिकी खेळाडूला रेड कार्ड मिळालेले असूनही ट्रम्प यांच्या आग्रहामुळे महासंघाने ते रद्द केले. पण याच महासंघाला स्पेनला बाजूला टाकण्याची कल्पनाही करणे अशक्य होते. अखेर स्पेनच्या संघाने ट्रम्प हजर असतानाच जगज्जेतेपद मिळवून दाखवले. देश म्हणून स्पेन ट्रम्प यांच्या अमेरिकेपुढे अत्यंत किरकोळ आहे. पण आपले स्वत्व सिध्द करून दाखवण्यामध्ये तो अव्वल आहे. जय हो.

**| विचार**

# औषधांची स्वस्ताई, आयफोनसाठी घाई

*अर्थजगतात समोर आलेली अलिकडील काळातील खास बातमी म्हणजे विविध विकारांवर कामी येणारी ३९ महत्वाची औषधे स्वस्त होणार आहेत. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे 'ईपीएफ'च्या नवीन पोर्टलमुळे कोट्यवधी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळून थकित रक्कम सुलभ आणि सत्वर मिळणार आहे. दरम्यान, बहुचर्चीत आयफोन-१७ च्या मागणीत प्रचंड वाढ दिसत असून ग्राहकांची बुकिंगसाठी घाई पहायला मिळत आहे.*



**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये अलिकडे काही ग्राहकोपयोगी बातम्या मोठ्या प्रमाणावर समोर आल्या. सर्वात पहिली महत्वाची बातमी म्हणजे विविध विकारांवर कामी येणारी ३९ महत्वाची औषधे स्वस्त होणार आहेत. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे 'ईपीएफ'च्या नवीन पोर्टलमुळे कोट्यवधी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळून त्यांची थकित रक्कम सुलभ आणि सत्वर मिळणार आहे. दरम्यान, बहुचर्चीत आयफोन-१७ च्या मागणीत प्रचंड वाढ दिसत असून ग्राहकांची बुकिंगसाठी घाई पहायला मिळत आहे.

देशातील सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांचा खर्च परवडावा यासाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्रीय राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनएपीए) औषध मूल्य नियंत्रण आदेश (डीपीसीओ)-२०१३ अंतर्गत तब्बल ३९ नवीन औषध फॉर्म्युलेशन्सचे किरकोळ दर निश्चित केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने उच्च रक्तदाब (हाय बीपी), मधुमेह, एचआयव्ही, हृदयविकार आणि डोळ्यांच्या संसर्गावर उपचारासाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या जीवनरक्षक औषधांचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या लाखो रुग्णांच्या खिशाला लागणारी मोठी कात्री थांबणार असून औषध बाजारातील कंपन्यांच्या मनमानी दरवाढीला लगाम बसणार आहे. प्राधिकरणाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार या महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी देशभरात तातडीने सुरू करण्यात आली आहे. नवीन दरपत्रकानुसार, उच्च रक्तदाबासाठी अत्यंत प्रभावी मानल्या जाणाऱ्या गोळीची किंमत आता प्रति गोळी १४.७४ रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाची असणारी कॅप्सूल आता केवळ ६.३७ रुपयांना मिळणार आहे. याशिवाय, डोळ्यांच्या संसर्गावर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आय ड्रॉपची किंमत ६८.६४ रुपये प्रति मिलिलीटर अशी निश्चित करण्यात आली असून, यामुळे विविध नामांकित ब्रँड्सच्या किमती कमालीच्या आटोक्यात येणार आहेत.

हा केवळ औषधांच्या किमती कमी करण्याचा निर्णय नसून बाजारात उपलब्ध असलेल्या नवीन औषध निर्मिती प्रकारांवर थेट सरकारी नियंत्रण प्रस्थापित करणारा मुद्दा आहे. औषध कंपन्यांकडून कोणत्याही नवीन कॉम्बिनेशन औषधांच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक लूट होऊ नये, हा यामागील मुख्य उद्देश आहे. केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, निश्चित केलेल्या या कमाल किमतींपेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करणे हा कायदेशीर गुन्हा मानला जाईल. एखाद्या औषध विक्रेत्याने किंवा उत्पादक कंपनीने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम वसूल केल्याचे आढळून आल्यास, कठोर दंडात्मक कारवाई केली जाणार असून बेकायदेशीरपणे वसूल केलेली जादा रक्कम व्याजासह सरकारजमा केली जाईल. या ऐतिहासिक निर्णयामुळे आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि परवडणारी होण्याच्या दिशेने देशाने एक आश्वासक पाऊल टाकले आहे. आता आणखी एक शुभ वार्ता. देशातील कोट्यवधी नोकरदार वर्गासाठी अत्यंत महत्त्वाची संस्था असलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) पीएफशी संबंधित नियमांमध्ये आणि संपूर्ण तांत्रिक व्यवस्थेत ऐतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ईपीएफओने आपली जुनी प्रादेशिक डेटाबेस प्रणाली पूर्णपणे मोडीत काढत अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड आयटी इनेबल्ड सर्व्हिसेस प्रकल्पांतर्गत सर्व सदस्यांची माहिती एकाच राष्ट्रीय डेटाबेसमध्ये स्थानांतरित केली आहे. केंद्र सरकारच्या या क्रांतिकारी पावसामुळे आता पीएफ क्लेम, ऑटो ट्रान्सफर आणि परतावा मिळण्याची प्रक्रिया कमालीची सुलभ होणार असून देशातील सहा कोटींपेक्षा अधिक कर्मचाऱ्यांना ईपीएफओच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्यापासून कायमची मुक्ती मिळणार आहे. या नवीन प्रणालीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे पूर्वी प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाचे स्वतंत्र असणारे डेटाबेस आता संपुष्टात आले असून संपूर्ण देशासाठी एकच केंद्रीय डेटाबेस कार्यरत झाला आहे. यामुळे एखाद्या कर्मचाऱ्याने नोकरी बदलली, तर जुन्या कंपनीचा पीएफ नवीन कंपनीच्या खात्यात वर्ग करण्यासाठी आता कोणतीही अडचण येणार नाही, कारण ही प्रक्रिया आता पूर्णपणे ऑटो ट्रान्सफर मोडवर चालणार आहे. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीमध्ये पीएफ खात्यातून पैसे काढण्याचे (निकासी) नियम अधिक सोपे करण्यात आले असून, क्लेम सेटलमेंटचा कालावधी कमालीचा कमी करण्यात आला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या गरजेच्या वेळी अत्यंत जलद गतीने आर्थिक मदत मिळणे शक्य होणार आहे.

केंद्रीय डेटाबेस प्रणालीमुळे पीएफच्या व्याजाची गणना आणि ते खात्यात जमा होण्याची प्रक्रियादेखील वेगवान होणार आहे. दरवर्षी व्याजाची रक्कम खात्यात जमा होण्यासाठी होणारा उशीर या नवीन पारदर्शक तंत्रज्ञानामुळे टळणार आहे. ईपीएफओने या सुधारणांसह नवीन ईपीएफ योजना-२०२६ अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि पेन्शनच्या तरतुदींसाठी विशेष पावले उचलली आहेत. या डिजिटल क्रांतीमुळे देशातील कोणत्याही ईपीएफओ अधिकृत कार्यालयातून सभासदांना त्यांच्या खात्याशी संबंधित सर्व सेवा आणि तक्रार निवारणाची सुविधा तत्काळ उपलब्ध होणार आहे. या नवीन पोर्टलचे आणि सेंट्रलाइज्ड प्रणालीचे थेट हस्तांतरण वेगाने पूर्ण केले जात असून, लवकरच या सेवा कर्मचाऱ्यांसाठी पूर्ण क्षमतेने खुल्या केल्या जातील. या सुधारणांमुळे पीएफ खात्यांमधील फसवणूक आणि तांत्रिक चुकांचे प्रमाण नगण्य होणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी ॲपलच्या आगामी आयफोन-१७ या मॉडेलबद्दल ग्राहकांमध्ये कमालीची उत्सुकता पाहायला मिळत असून मागणीत अचानक प्रचंड वाढ झाली आहे. तंत्रज्ञान बाजारातून मिळालेल्या माहितीनुसार, अधिकृत लाँचिंगपूर्वीच या फोनसाठी जगभरातून आणि विशेषतः भारतीय बाजारपेठेतून मोठ्या प्रमाणावर चौकशी आणि आगाऊ नोंदणीचे कल वाढू लागले आहेत. अत्याधुनिक फीचर्स आणि प्रीमियम लूकसाठी ओळखल्या जाणाऱ्या ॲपलच्या या नवीन स्मार्टफोन मालिकेची बाजारपेठेत अत्यंत आतुरतेने वाट पाहिली जात असून ग्राहकांमध्ये खरेदीसाठी अभूतपूर्व क्रेझ निर्माण झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. या मागणीमध्ये अचानक झालेल्या तुफान वाढीमागे एक अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे आगामी काळात या फोनच्या किमतीत होणारी संभाव्य वाढ. ॲपलने नुकतीच आपल्या इतर काही प्रमुख उत्पादनांच्या आणि गॅजेट्सच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. कंपनीच्या या जागतिक धोरणाचा अंदाज घेऊन आयफोन-१७च्या किमतीदेखील पूर्वीच्या मॉडेल्सच्या तुलनेत अधिक महाग असणार असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे लाँच झाल्यानंतर किमती आवाक्याबाहेर जाण्यापूर्वीच किंवा सुरुवातीच्या टप्प्यातच हा फोन पदरात पाडून घेण्यासाठी ग्राहकांनी आत्तापासूनच आर्थिक नियोजन आणि बुकिंगसाठी घाई सुरू केली आहे.

किंमतवाढीच्या भीतीव्यतिरिक्त आयफोन-१७ मध्ये समाविष्ट करण्यात येणारे प्रगत तंत्रज्ञान आणि एआय फीचर्सदेखील ग्राहकांना आकर्षित करत आहेत. या नवीन सिरीजमध्ये कंपनी अधिक वेगवान प्रोसेसर, सुधारित कॅमेरा सेन्सर आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी क्षमता देणार असल्याची चर्चा आहे. बाजारातील विश्लेषकांच्या मते, प्रीमियम सेगमेंटमध्ये स्वतःचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी ॲपल या मॉडेलमध्ये क्रांतिकारी बदल करत आहे. याच कारणामुळे तंत्रज्ञानप्रेमी आणि नियमित आयफोन वापरकर्ते या नवीन अपग्रेडसाठी प्रचंड उत्सुक आहेत. त्याचा थेट परिणाम मागणी वाढण्यात झाला आहे. किरकोळ विक्रेते आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर आयफोन-१७ च्या संदर्भातील ग्राहकांच्या चौकशीचे प्रमाण गेल्या काही आठवड्यांमध्ये दुप्पट झाले आहे. ॲपलच्या उत्पादनांची वाढती किंमत ग्राहकांच्या खिशावर ताण आणणारी असली, तरी ब्रँडची विश्वासार्हता आणि स्टेटस सिम्बॉलमुळे मागणीमध्ये कोणतीही घट झालेली नाही. आगामी सणासुदीच्या काळात या फोनचे लाँचिंग होण्याची शक्यता असल्याने तोपर्यंत ही मागणी अशीच टिकून राहील आणि बाजारात आयफोन १७ चा नवा विक्रम प्रस्थापित होईल, असा अंदाज किरकोळ क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**| चर्चा आजची**

# प्रवाशांवरील आर्थिक भार संपेना

**प्रमोद जाधव**

वाट पाहीन पण एसटीनेच जाईल ही भावना आजही सर्वसामान्य प्रवाशांमध्ये कायम आहे.एसटी प्रवास, सुखाचा प्रवास हे समोर ठेवून लाखो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. सर्वसामान्य प्रवाशांची जीवन वाहीनी म्हणून एसटीला बोलले जाते. प्रवाशांच्या वाढत्या संख्येने एसटीच्या उत्पन्नात वाढ होत आहे.मात्र याच प्रवाशांच्या खांद्यावर वेगवेगळ्या पध्दतीने आर्थिक भार सोपविण्याचा फंडा एसटी महामंडळाने सुरु केला आहे. एसटीकडून स्मार्ट कार्ड देण्याचा प्रयत्न सुरु आहे.मात्र आजही एसटीचे कामकाज स्मार्ट नाही. धक्केबुक्के खात गर्दीतून प्रवास करण्याची वेळ काही अजूनही संपली नाही. परंतु वेगवेगळ्या माध्यमातून प्रवाशांना आर्थिक भार देण्याचा प्रयत्न महामंडळाचा वाढतच चालला आहे. अधिभारानंतर स्वच्छता भार आता, स्मार्ट कार्डच्या नावाखाली लुट सुरु असल्याचे चित्र समोर आले आहे.

रस्ता तेथे एसटी पोहचली आहे. गावे, वाड्यांमध्ये असलेल्या रस्त्यांमधून एसटी जाऊन प्रवाशांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहे. शाळा महाविद्यालयासह नियमीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वेगवेगळ्या योजनांमधून एसटीतून सवलत मिळत आहे. त्यामुळे एसटीला सर्वस्तरातील प्रवाशांकडून पसंती दर्शविली जात आहे. एसटीचे चालक व वाहक घेऊन भरती झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून लाखो प्रवासी एसटी बसमधून प्रवास करतात. एसटी आणि सर्वसामान्यांचे अतूट नाते आजही कायम आहे. एसटीला गळती असणे, आसन खराब असणे, रस्त्यात बंद पडणे अशा अनेक समस्या असतानाही प्रवासी एसटीतून प्रवास करतात. साधारणपणे एसटीमध्ये ४० ते ५० आसन व्यवस्था व १३ उभे प्रवाशांना मान्यता आहे. तरीदेखील एका एसटीतून ९०हून अधिक सर्वसामान्य प्रवासी प्रवास करतात. निश्चित स्थळी चालक सुखरूप पोहचवेल अशा विश्वास प्रवाशांना असतो. बस स्थानकांची असलेली दुरावस्था, बसमधील असुविधा अशा अनेक प्रश्नांकडे दुर्लक्ष करून धक्काबुक्की खात प्रवासी बसमधून प्रवास करतात. मात्र कधीही आरामदायी प्रवास मिळावा, अशी मागणी सर्वसामान्य प्रवाशांनी केली नाही. अपूऱ्या बसेस, अपुरे मनुष्यबळ अभावी प्रवाशांना आहे,



त्याच स्थितीत प्रवास करावा लागत आहे. मात्र प्रवाशांना आरामदायी प्रवास करता, यासाठी कधीही एसटी महामंडळाने प्रयत्न केल्याचे चित्र आजही दिसून येत नाही.

मागील काही वर्षापुर्वी एसटी महामंडळाने अधिभारच्या नावाखाली एक रुपये त्यानंतर गेल्या काही महिन्यापुर्वी स्वच्छता भारच्या नावाखाली दोन रुपये घेण्यास सुरुवात केली आहे. आता एसटी तोटा भरून काढण्यासाठी प्रवाशांवर आर्थिक भार सोपविण्यात आला आहे. अलिबागहून पुणे, स्वारगेट, पनवेल,अक्कलकोट, पंढरपूर, सातारा, कल्याण, खोपोली, बोरीवली, ठाणेकडे पोहचण्यासाठी आता तिकीट दरामध्ये चार रुपयांपासून ८६ रुपयापर्यंत अधिक पैसे मोजण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, रोहा, महाड, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड या आठ आगार असून २१हून अधिक बस स्थानके आहेत. साधारणपणे दहा लाखहून अधिक प्रवास प्रवाशांकडून होतो. यातूनच एसटीला महिन्याला साधारणपणे ३० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक, नियमीत प्रवास करणारे प्रवासी अशा सर्वच स्तरातील प्रवाशांकडून एसटीला उत्पन्नाचा आधार मिळतो. परंतू याच प्रवाशांच्या आर्थिक अडचणीत टाकण्याचे एसटी महामंडळाने केले आहे. एसटी बस म्हणजे ग्रामीण भागातील जीवन वाहीनी म्हणून ओळखली जाते. गाव तेथे एसटी या संकल्पनेच्या अधारावर आज एसटी बस ग्रामीण भागात खेड्या पाड्यात धावत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी एसटीचे महत्व प्रचंड आहे. एसटी महामंडळाने महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली. त्यामुळे एसटीतून प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या प्रचंड वाढली. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र एसटी महामंडळाने तिकीट दरात भरमसाठ वाढ केल्याने महिला प्रवाशांकडून तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. वाढत्या तिकीट दरामुळे प्रवाशांच्या महिन्यातील खर्चाचा ताळमेळ बिघडला आहे. सर्वसामान्यांना आधार ठरलेल्या एसटी महामंडळाचा आर्थिक भार आता प्रवाशांच्या खांद्यावर सोपविण्यात आला आहे. मागील काही महिन्यापुर्वी स्वच्छता भारच्या नावाखाली तिकीटात दोन रुपयांनी वाढ केली. आता एसटीचा आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी तिकीट दरात भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. अलिबागहून मुंबई, पुणे, पेण, रोहा आदी मार्गावर जाण्यासाठी चार रुपयांपासून ८६ रुपयांपर्यंत अधिक पैसे मोजण्याची वेळ प्रवाशांवर येणार आहे. त्यामुळे जिल्हयातील लाखो प्रवाशांच्या विशेषतः महिला वर्गाच्या खिशाला कात्री बसणार आहे. या दर वाढीबाबत अनेकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. प्रवाशांवरील आर्थिक भार कधी संपणार असा प्रश्न प्रवासी वर्गाकडून विचारला जात आहे.

**लोकसंसद**

## मरणानंतरही सामान्यांची फरफट




मुंबईत एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे पार्थिव इस्पितळातून घरी किंवा स्मशानभूमीपर्यंत नेण्यासाठी शववाहिनी मिळवताना नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. महापालिकेच्या रुग्णालयांत नाममात्र शुल्कात शववाहिनीची सुविधा असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात वाहन किंवा चालक उपलब्ध नसल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. परिणामी, खासगी शववाहिन्यांसाठी जादा पैसे मोजण्याची वेळ येते. पूर्वी महापालिकेतर्फे संपूर्ण मुंबईसाठी एकाच संपर्क क्रमांकावर २४ तास उपलब्ध असलेली शववाहिनी सेवा कार्यरत होती. नाममात्र शुल्कात पार्थिव इस्पितळातून घरी तसेच स्मशानभूमीपर्यंत नेण्याची सुविधाही मिळत होती. आज मात्र ही व्यवस्था प्रभावीपणे दिसून येत नाही. सामान्य माणसाने जिवंतपणी संघर्ष करायचाच; पण मरणानंतरही त्याच्या अंतिम प्रवासासाठी कुटुंबीयांची होणारी फरफट थांबविण्यासाठी महापालिका प्रशासनाने पूर्वीप्रमाणे सर्वसमावेशक, २४७ शववाहिनी सेवा पुन्हा सक्षमपणे सुरू करावी, हीच अपेक्षा.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

**| दिनविशेष**

# प्रतिभावान गीतकार आनंद बक्षी



आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले. कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र, त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८ मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते.

सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले. या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महीना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), सावन के झूले पडे (जुर्माना), दम मारो दम (हरे राम) ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी. कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२१ जुलै

१) श्रीमती विमल गणपत भगत
अलिबाग, २१-७-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# इसांबा फाटा ठरतोय धोकादायक

## • अपघाताची भीती कायम; तात्काळ गतिरोधक बसविण्याची मागणी



**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

पेण-खोपोली राज्यमार्गावरील इसांबा फाटा हा दिवसेंदिवस धोकादायक ठरत असून, येथे अपघाताची भीती कायम आहे. त्यामुळे येथे तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याची मागणी कामगार वर्ग, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्या असल्याने सकाळी आणि संध्याकाळी हजारो कामगार दुचाकी, चारचाकी तसेच कंपनीच्या बसमधून ये-जा करतात. त्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्याही लक्षणीय असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

इसांबा फाटा हा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून बाहेर पडणाऱ्या वाहनांसाठी महत्त्वाचा जोडरस्ता आहे. त्यामुळे कंटेनर, ट्रक, बस, टँकर आणि इतर अवजड वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. अनेक वाहने भरधाव वेगाने येत असल्यामुळे फाट्यावरून रस्ता ओलांडणे किंवा वळण घेणे धोकादायक ठरत आहे. विशेषतः सकाळी कामावर जाण्याच्या आणि सायंकाळी सुट्टीच्या वेळेत वाहतुकीचा ताण वाढतो. अशा परिस्थितीत क्षणभराचा निष्काळजीपणा मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

इसांबाफाटा येथे अद्याप प्रभावी वेगमर्यादा नियंत्रणाची व्यवस्था नसल्याने वाहनचालकांचा वेग कमी होत नाही. त्यामुळे अनेकवेळा किरकोळ अपघात, अचानक ब्रेक लावण्याच्या घटना आणि वाहनांची धडक टळल्याची उदाहरणे घडत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन येथे मानकांनुसार गतिरोधक, इशारा फलक, रिफ्लेक्टर आणि झेब्रा क्रॉसिंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

> **या परिसरात अनेक उद्योग असल्यामुळे हजारो कर्मचारी दररोज या मार्गाचा वापर करतात. एक्सप्रेस वेवरून येणाऱ्या अवजड वाहनांमुळे अपघाताचा धोका कायम आहे. प्रशासनाने विलंब न करता इसांबे फाट्यावर गतिरोधक बसवून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे.**
> **- नवज्योत पिंगळे, कर्मचारी, टाटा स्टील**

## महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**मुंबई** : मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुंबई शहर जिल्ह्यात बुधवार दि.२२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. १७९-सायन-कोळीवाडा विधानसभा मतदारसंघात समाज मंदिर हॉल, सरदार नगर नं.१, महानगरपालिका शाळेसमोर, सायन (पू), मुंबई येथे १८१-माहिम विधानसभा मतदार संघासाठी रविंद्र नाट्यमंदिर, सिध्दिविनायक मंदिराजवळ, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई येथे तर १८५-मलबार हिल विधानसभा मतदारसंघात शारदा मंदिर हायस्कूल, तळमजला, शारदा मंदिर हॉल, शिवतापी बिल्डींगजवळ, जे.के. टॉवर च्या समोर, गोरेगावकर मार्ग, गावदेवी, मुंबई येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना महसूल विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांसोबतच केंद्र शासनाचे/राज्य शासनाचे विविध विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील विविध योजनांचा लाभ तसेच सेवा हमी कायद्यानुसार द्यायच्या सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिकांनी या योजनांचा तसेच सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



## सुयोग पाटील ठरला शिष्यवृत्तीधारक

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीत अलिबाग तालुक्यातील को.ए.सो. माध्यमिक विद्यामंदिर, शहाबाज येथील विद्यार्थी सुयोग गीता सुनील पाटील हा शिष्यवृत्तीधारक ठरला आहे. विशेष म्हणजे त्याने जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये १३वा क्रमांक मिळवून शाळा, पालक व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

सुयोगच्या या उल्लेखनीय यशाबद्दल को.ए.सो. संस्थेचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील, ज्येष्ठ संचालक संजय पाटील, सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, अनिता पाटील व कार्यकारी मंडळ, शाळा समितीचे चेअरमन अशोककुमार भगत व सर्व सदस्य, पत्रकार जीवन पाटील, माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. तसेच त्याच्या या यशामागील त्याची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचेही सर्वांनी कौतुक केले.

# श्रमदानातून उभारला तात्पुरता रस्ता

## महिलांसह शेकडो ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील आणि माथेरानच्या पायथ्याशी सानिध्यात वसलेली आरकसवाडी, पिरकडवाडी आणि उंबरणेवाडी या दुर्गम वाड्यांतील रस्त्याच्या प्रश्नाकडे शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. अखेर श्रमदानाच्या माध्यमातून तात्पुरता स्वरूपाचा रस्ता तयार करण्याचा निर्णय आरकसवाडी, पिरकडवाडी आणि उंबरणेवाडीतील ग्रामस्थांकडून घेण्यात आला.



पावसाच्या पाण्याच्या प्रवाहामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने ये-जा करणे अत्यंत धोकादायक झाले होते. त्यामुळे ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेत दगड, माती टाकून खड्डे भरत तात्पुरत्या स्वरूपात रस्ता तयार केला. या श्रमदान मोहिमेत तिन्ही वाड्यांतील शेकडो ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिलांसह युवकांनीही मोठ्या प्रमाणावर श्रमदान करून रस्ता वाहतुकीयोग्य केला.

काही दिवसांपूर्वी या भागातील एका गरोदर महिलेला रस्त्याअभावी कापडी झोळीतून उचलून दवाखान्यात नेण्याची वेळ आली होती. त्यानंतर प्रसूती होऊन मुलगा जन्माला आल्यानंतर चार ते पाच दिवसांनी नवजात बाळ आणि मातेलाही झोळीतूनच घरी आणावे लागले होते. या घटनेमुळे परिसरातील दळणवळणाच्या समस्येचे गांभीर्य पुन्हा एकदा समोर आले होते.

ग्रामस्थांनी अनेकदा शासन आणि प्रशासनाकडे रस्त्याच्या कामासाठी मागणी करूनही त्याची दखल घेतली गेली नाही. अखेर स्वतःच श्रमदानातून तात्पुरता रस्ता उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रशासनाने आता कायमस्वरूपी दर्जेदार रस्ता उभारण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी परिसरातून होत आहे.

# शिहूतील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

शिहू येथील भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रायगड जिल्हा रक्तपेढी, अलिबाग यांच्या सहकार्याने रविवारी (दि.१९) डॉ. भोईर क्लिनिक, शिहू येथे आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात युवक, महिला आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



या शिबिरात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. 'एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात' हा संदेश देत आयोजकांनी रक्तदानाबाबत जनजागृती केली.

यावेळी उपस्थित उद्धव ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी या सेवाभावी मानवता वादी उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असा संदेश यावेळी भोईर यांनी दिला. यावेळी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानण्यात आले.

# गाडी लावण्याच्या वादातून मारहाण

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड शहराच्या हद्दीतील अप्सरा हॉटेल शेजारी असलेल्या दवाखान्याच्या समोर महाड नगरपालिकेच्या सार्वजनिक रोडवर गाडी लावण्यावरून प्रसिद्ध डॉक्टर यांनी एका मुलास मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

तक्रारदार मकरंद धोत्रे यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी आपली स्वतःची पिकअप गाडी सार्वजनिक रोडवर थोडा वेळ लावली होती. यावेळी समोरून येणारे डॉक्टर खान यांची चारचाकी गाडी आपल्या क्लिनिकमध्ये जाण्यासाठी आली. त्यांनी मागून हॉर्न दिल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची गाडी तरीदेखील बाजूला न घेतल्याने त्यांचा एमेकमेकांत वाद झाला. वादाचे रूपांतर मारामारीत झाले. डॉक्टर खान यांनी तक्रारदार मकरंद धोत्रे याला खाली पाडून मारत असल्याचा व्हिडिओ व्हायला झाला आहे. या सगळ्या प्रकरणावरून महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये एनसी दाखल झाला असून पुढील तपास महाड शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

# शैक्षणिक साहित्याचे वाटप

**| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याच्या उद्देशाने ऊर्मी संस्था, पुणे आणि अफिनिटी एक्स कंपनीच्या सीएसआर निधी अंतर्गत तालुक्यातील १५१ शाळांमधील ४,०५९ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

सुधागड हा डोंगराळ, दुर्गम व आदिवासीबहुल तालुका असल्याने अनेक विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होण्यास, शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यास तसेच शिक्षकांच्या अध्यापन प्रक्रियेला अधिक प्रभावी बनविण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

या उपक्रमाचे नियोजन गटशिक्षण अधिकारी सादुराम बांगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व केंद्रप्रमुखांच्या सहकार्याने करण्यात आले.

# वृक्षसंवर्धन विषयक जागरूकता उपक्रम

**| खांब | प्रतिनिधी |**

दीपक नायट्राईट कंपनी, धाटाव तसेच दीपक फाउंडेशनच्या प्रकल्प विवेक विद्या आणि यंग सायंटिस्ट एसटीइएम यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपालिका शाळा क्र.०९, रोहा येथे वृक्षसंवर्धन विषयक विशेष जागरूकता सत्र कार्यक्रम साजरा करण्यात आला.




वन विभागाच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करणे हा होता. या कार्यक्रमात प्रकल्प विवेक विद्यामधील ९२ विद्यार्थी आणि एसटीइएम प्रकल्पातील १८५ विद्यार्थी असे एकूण २७७ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व, पर्यावरणीय संतुलन राखण्यात वृक्षांची भूमिका तसेच निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येकाची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास वन विभागाचे वनपाल अधिकारी संतोष रेवणे आणि विलास वाघमारे तसेच वनरक्षक अक्षय चौगुले, मुनिया मुल्ला, शुभदा वरघडे आदींसह दीपक फाउंडेशनतर्फे प्रकल्प समन्वयक प्रीती कापसे, समुपदेशिका ओजस्विनी महाडीक, फिल्ड सुपरवायझर मृणाली मरवडे, सोनाली शिंदे, तृणाली पाटील, प्राजक्ता धुमाळ, प्राची शिर्के तसेच अमोल जाधव उपस्थित होते.

**आषाढी वारीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा | तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून तात्काळ उपचार**

# 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची'

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी २०२६ मध्ये सहभागी झालेल्या वारकरी भाविकांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत व्यापक आणि दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने पालखी मार्गावरील प्रत्येक वारकऱ्यापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे नियोजन यशस्वीपणे राबविले आहे. वारीदरम्यान ताप, श्वसनविकार, अतिसार, उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारख्या विविध आरोग्य समस्यांवर त्वरित उपचार करण्यात येत आहेत. आतापर्यंत ३ लाख ८३ हजार ६४३ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली आहे. ३ लाख ८० हजार ४८५ बाह्यरुग्णांवर उपचार, ३ हजार १५८ रुग्णांना आंतररुग्ण सेवा आणि ८८३ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे.



वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ४३ सुसज्ज आयसीयू, १५६ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आणि ३०२ तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत आहेत. तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून भाविकांना तात्काळ उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत.

पंढरपूरमध्ये २४ तास कार्यरत आयसीयू, ३ दिवसांचे महाआरोग्य शिबीर, तसेच यंदाच्या वारीचे विशेष आकर्षण असलेली एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि तात्काळ आरोग्य सेवा मिळत आहे.

राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांना सुरक्षित, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, वारीच्या संपूर्ण कालावधीत आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

**विशेष स्वच्छता मोहीम**

**पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया आदी कीटकजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, हॉटेल व धाब्यांमधील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, वारीनंतर विशेष स्वच्छता मोहीम, असंसर्गजन्य आजारांची तपासणी, आरोग्य जनजागृती तसेच आरोग्यसंपन्न वारी डिजिटल ॲपच्या माध्यमातून तातडीच्या आरोग्य सुविधांची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**पान १ वरून**

## बेस्टच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

बस सायन-पनवेल महामार्गावरून जात असताना मानखुर्द येथील विश्वकर्मा रुग्णालयासमोरील दुभाजकाला धडकली. त्या वेळी ६५ वर्षीय भास्कर रावसाहेब पांडे हे महामार्ग ओलांडण्यासाठी दुभाजकाजवळ उभे होते. बस थेट दुभाजकावर आदळल्याने पांडे यांना जोरदार धडक बसली. त्यांना तातडीने घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हा अपघात बस चालकाचे अचानक नियंत्रण सुटल्यामुळे झाल्याचे बोलले जात आहे. तसेच, या अपघातात बसचे चालक बनवारी श्रीराम प्रसाद शर्मा (५१) आणि वाहक वैभव वाघमारे (४१) हे जखमी झाले आहेत. तर, जखमी प्रवाशांमध्ये शिवमंगल मैती (४२), गणेश पटेल (२४), लता वाघेला (४३), राजेश वरुगामिना (३५) व अंकिता जाधव (२२) यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा मानखुर्द स्थानिक पोलीस अधिक तपास करत आहेत.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

या अपघातामुळे पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावरील अपघातांचा मुद्दा उपस्थित होत आहे. रात्री इथेनॉल घेऊन जाणारा टँकर उलटल्याने समृद्धी महामार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली होती. त्यामुळे वाहनांचा अंदाज न आल्याने हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे.

## 'चलो संसद'वर लाठीचार्ज

साधण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारणे ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. केंद्र सरकारने अहंकार बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णय घ्यावा आणि या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली. सरकारशी चर्चेनंतरही आंदोलन आणखी भडकले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सीजेपीच्या शिष्टमंडळाने केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेत विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. मात्र, चर्चेत कोणतेही ठोस आश्वासन मिळाले नसल्याचा दावा करत आंदोलनकर्त्यांनी संसदेकडे कूच करण्याचा निर्णय कायम ठेवला. सरकारने प्रश्न सोडविण्याऐवजी वेळकाढूपणाची भूमिका घेतल्याचा आरोपही सीजेपीकडून करण्यात आला.

**संसद परिसर छावणीत; हजारो जवान तैनात**

'चलो संसद' मोर्चाच्या पार्श्वभूमीवर संसद भवन, विजय चौक, जंतर-मंतर आणि आजूबाजूचा परिसर अक्षरशः पोलीस छावणीत बदलला होता. दिल्ली पोलिसांसह निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. अनेक मार्गांवर बॅरिकेड्स उभारण्यात आले, तर काही मेट्रो स्थानकांवरही कडक निर्बंध लागू करण्यात आले.

**वांगचुकांच्या आवाहनाला देशभरातून प्रतिसाद**

गेल्या वीस दिवसांपासून उपोषणावर असलेले पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना रुग्णालयात हलवल्यानंतरही त्यांनी आंदोलन सुरू ठेवण्याचे आवाहन केले. त्यानंतर देशभरातील विविध राज्यांतील विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि युवक संघटना मोठ्या संख्येने दिल्लीत दाखल झाल्या. त्यामुळे चलो संसद आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## चिडीपाडा गावात पाणी टंचाई

करणाऱ्या संबंधित राजकीय व्यक्तीवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असला, तरी पाईपलाईन फुटल्याने चिडीपाडा येथील नागरिकांचे पाण्याविना हाल झाले आहेत. ही पाईप लाईन दुरुस्ती करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## दिबांच्या नामकरणाचा दिल्लीत लढा

सन्मान म्हणून लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्यात यावे, अशी त्यांची ठाम मागणी आहे. आंदोलनकर्त्यांच्या मते, राज्य सरकारकडील आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे आता अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी केंद्र सरकारची असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, ''चलो दिल्ली, चलो जंतर-मंतर'' अशी घोषणा देत भूमिपुत्रांनी राजधानीत आपला आवाज बुलंद करण्याची तयारी सुरू केली आहे. ''राज्य सरकारने प्रस्ताव पाठवला, आता केंद्र सरकार निर्णय कधी घेणार?'' असा सवालही आंदोलनकर्त्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे. त्यामुळे भूमिपुत्रांनी दि.५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून, भूमिपुत्रांच्या अस्मितेशी जोडल्या गेलेल्या या प्रश्नावर आता दिल्लीत निर्णायक संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे या आंदोलनाकडे नवी मुंबईसह संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. तसेच, विमानतळाच्या नामकरणाच्या प्रश्नावर केंद्र सरकार काय भूमिका घेते, याकडे देखील सर्वांचे लक्ष राहणार आहे.

## प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठ्या; हीच का लोकशाही?

झालेला लाठीचार्ज हा लोकशाहीवरील हल्ला आहे, असेही त्या म्हणाल्या. दिल्लीतील जंतरमंतरवर ज्येष्ठ शास्त्रज्ञ सोनम वांगचूक यांच्यासह विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते अनेक दिवस उपोषण करत होते. त्यांची दखल घेण्याऐवजी त्यांना रुग्णालयात नेलं गेलं. हे लोकशाहीचं नव्हे, तर लोकशाहीच्या हत्येचं चित्र आहे. पेपरफुटी ही सरकारची चूक आहे. विद्यार्थ्यांची मागणी एवढीच होती की, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. पण सरकारचा अहंकार इतका वाढला आहे की, संवाद साधण्याऐवजी विद्यार्थ्यांवर लाठ्या चालवल्या जात आहेत. अभिजीत दिपके आणि आंदोलनकर्त्यांनी वारंवार शांततापूर्ण आंदोलनाची भूमिका घेतली. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आधार घेत आंदोलन सुरू होते. मग अशा विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला? असा संतप्त सवालही चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला.

**हे आंदोलन सरकारमुळेच चिघळले**

आंदोलन उग्र होण्यास सरकारच जबाबदार असल्याचा आरोप करत चित्रलेखा पाटील म्हणाल्या कि, विद्यार्थ्यांशी वेळेत संवाद साधला असता, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले असते, तर परिस्थिती एवढी बिघडली नसती. पेपरफुटी हे सरकारचे अपयश आहे. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत घेतात, क्लासेस लावतात, लाखो रुपये खर्च करतात; पण त्यांच्याच भविष्याशी खेळ झाला. लोकशाहीत आंदोलन होणारच, नागरिक प्रश्न विचारणारच, सरकारला प्रश्न विचारला म्हणून कोणी देशद्रोही ठरत नाही. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्यासाठी पोलीस बळाचा वापर करणे अत्यंत दुर्दैवी आहे, असेही त्या म्हणाल्या.

## लाखोंचा चरस जप्त

सुरेंद्र गरड यांना मिळाली. पथक तयार करून शेखाडीकडून आरावीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कोंडीवली स्मशानभूमीसमोर शनिवारी (दि.१८) रात्री सापळा रचला. त्या ठिकाणी दुचाकीवरून येणाऱ्याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. दुचाकीमधील डिकीमध्ये अंमली पदार्थ चरसचा साठा आढळून आला. यावेळी ६.९९६ किलो ग्रॅम वजन असलेल्या ३४ लाख रुपयांचा चरस, दुचाकी व मोबाईलदेखील जप्त करण्यात आला. याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला न्यायालयाने दि.२२ जूलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## विचुंबे ग्रामपंचायतीत उलथापालथ

न्यायालयाने दि.१४ जुलै रोजी हे दोन्ही आदेश पारित केले असून, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) डॉ. रविंद्र शेळके यांनी त्याबाबतचे सूचनापत्र जारी केले आहे. दोन्ही प्रकरणांत अर्जदार प्रणाली भोईर यांचे दावे मान्य करण्यात आले असून, खर्चाबाबत कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. तसेच, निकालाची माहिती सर्व संबंधितांना देऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पनवेल तहसीलदारांना पनवेल आदेश बजावण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे विचुंबे ग्रामपंचायतीतील भाजपला मोठा धक्का बसल्याची चर्चा सुरू झाली असून, सरपंच आणि सदस्य या दोन्ही पदांवरील अपात्रतेमुळे ग्रामपंचायतीच्या पुढील कारभाराबाबत प्रशासकीय प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या निर्णयाविरोधात संबंधितांकडून उच्च न्यायालयात किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडे आव्हान दिले जाणार का, याकडे आता संपूर्ण पनवेल तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बायपासच्या ब्रिजचे काम रेंगाळले

## • अपूर्ण कामावर आश्वासनांचा पाऊस • तारीख पे तारीख देऊन तात्पुरते समाधान



**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील बहुप्रतीक्षित माणगाव-इंदापूर बायपास गणेशोत्सवापूर्वी किमान एकेरी वाहतुकीसाठी खुला होणार, असा दावा पुन्हा एकदा समोर आला असला तरी प्रत्यक्ष कामाची सद्यस्थिती पाहता हा दावा वास्तवापासून दूर असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. गेली १७ वर्षे रखडलेल्या या प्रकल्पाबाबत पुन्हा एकदा आश्वासनांची मालिका सुरू झाली असून, प्रत्यक्ष कामाच्या गतीवर मात्र प्रश्नचिन्ह कायमच राहिले असून बायपासच्या कामाचा ब्रिजचे काम रेंगाळले आहे. सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे एका एक महिन्यात कसे पूर्ण होणार यावर प्रश्नचिन्ह उभारले जात असून गणेशोत्सवापूर्वी एकरी मार्गीका सुरू होईल असे लोकप्रतिनिधी सांगून आश्वासनाचा पाऊस पाडत आहेत. त्यामुळे या मार्गावर तारीख पे तारीख मिळत आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी नुकतीच बायपासची पाहणी करून गणेशोत्सवापूर्वी एक मार्गिका सुरू करण्याचे निर्देश दिले. मात्र, त्याआधी अवघ्या महिनाभरापूर्वी मंत्री भरत गोगावले यांनीही याच प्रकल्पाची पाहणी करून अधिकाऱ्यांसोबत आढावा घेतला होता. त्या वेळीही कामाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तरीही प्रत्यक्षात कामाचा वेग अपेक्षित पातळीवर पोहोचलेला दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सध्या कोकणात मुसळधार पावसाचा हंगाम सुरू असून अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावरील महामार्गाचे बांधकाम पूर्ण करणे तांत्रिकदृष्ट्या अत्यंत कठीण मानले जाते. विशेषतः कोकण रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल आणि गोध नदीवरील पुलाचे काम अद्याप प्राथमिक अवस्थेत असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी केवळ पीसीसी कॉलम उभे करण्यात आले असून मुख्य गर्डर, डेक स्लॅब आणि जोडरस्त्यांची कामे अद्याप बाकी आहेत. याशिवाय पुलांचे काम पूर्ण झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकणे आवश्यक आहे. मात्र पावसाळ्यात अशा प्रकारचा भराव करणे अवघड असते. आवश्यक माती उपलब्ध करून ती वाहून आणणे, तिचे योग्य संपीडन करणे आणि त्यानंतर रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित करणे ही वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी एकेरी वाहतूक सुरू होईल, या दाव्याबाबत अभियंते आणि स्थानिक जाणकारही साशंक असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, संबंधित अधिकारी आणि ठेकेदार लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष कामाची वस्तुस्थिती पूर्णपणे सांगत नसल्याचा आरोपही नागरिकांतून होत आहे. गेल्या १७ वर्षांत या प्रकल्पासाठी अनेक वेळा अंतिम मुदती जाहीर झाल्या. विविध सरकारे आणि लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी आश्वासने दिली; परंतु प्रत्येक वेळी मुदत पुढेच ढकलली गेली. त्यामुळे आता नागरिकांचा विश्वास केवळ घोषणांवर राहिलेला नाही. तारीख पे तारीख देऊन तात्पुरते समाधान केले जाते, मात्र काम मात्र, संथगतीनेच सुरू राहते, अशी टीका नागरिक करत आहेत.

> **“गणेशोत्सव आला की बायपासची आठवण आणि आश्वासनांचा पाऊस, हा गेल्या अनेक वर्षांचा ठरलेला पायंडा आहे. प्रत्यक्षात ठेकेदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी स्थानिकांना विश्वासात घेत नाहीत, त्यामुळे प्रश्न कायमच प्रलंबित राहतात.तसेच आमसभा ही या प्रश्नावर लावली गेली नाही पूर्वी तालुका समन्वय व पुनर्विलोकन समिती असायची ती समिती अस्तित्वात नाही. त्या बैठकीत असे विषय व्हायचे, आता ते होताना दिसत नाही. आता केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृती आणि शेतकऱ्यांना न्याय देण्याची वेळ आली आहे.**
> **– ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष तथा गरसेवक, माणगाव”**




## नगरपालिकेच्या सभागृहाला जगतापांचे नाव

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड नगरपरिषदेच्या सभागृहाला माजी आ. स्व माणिकराव जगताप यांचे नाव देण्याचा ठराव नगरपरिषदेच्या (दि.२५) जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेला होता. मात्र, या ठरावाची अंमलबजावणी नगरपरिषद प्रशासनाकडून केली जात नव्हती. अखेर शेवटी सहा वर्षींनी झालेल्या ठरावाची अंमलबजावणी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाच्या नगरसेवकांनी सभागृहाला स्व. माणिकराव जगताप यांचे नाव देण्याच्या ठरावाची अंमलबजावणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाचे नगरसेवक उपस्थित होते. परंतु सत्ताधारी पक्षाचे नगराध्यक्ष व नगरसेवक उपस्थित नसल्यामुळे पुढील होणाऱ्या मासिक मिटींगला काय निर्णय होणार याकडे महाडकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

## माथेरानमध्ये छत्र्यांचे वाटप

**माथेरान** : पावसाळ्यात सर्वसामान्य लोकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने नेहमीप्रमाणे एक सेवाभावी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या माध्यमातून (दि.२०) जुलै रोजी श्रीराम चौकात मोफत छत्र्यांच्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे नगरसेवक, नगरसेविका त्याचप्रमाणे स्थानिक नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सुनील शिंदे, रिझवाना शेख, योगेश जाधव, विद्यार्थ्यी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वावे रस्त्याच्या दुतर्फात वृक्षारोपण



**| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |**

वाढते शहरीकरण आणि निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल राखण्यासाठी ग्रामीण भागातील तरुण पिढी आता पुढे येत आहे. याचाच एक आदर्श वस्तुपाठ सुधागड तालुक्यातील वावे गावाने घालून दिला आहे. ग्रामस्थ मंडळ वावे आणि वावे युवाशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१९) जुलै रोजी परिसरात विशेष वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत वावे गाव ते सनशील्ड कंपनी आणि वावे गाव ते मजरे जांभूळपाडा बसस्टॉप दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा तब्बल १०० वृक्षांची लागवड करण्यात आली.

रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रत्येक वाटसरूला भविष्यात मायेची सावली मिळावी आणि परिसरातील पर्यावरणाचा समतोल उत्तम प्रकारे राखला जावा, हा या वृक्षारोपणाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी वड, पिंपळ, कडुनिंब यांसारख्या विविध सावली देणाऱ्या आणि पर्यावरणाला पूरक असणाऱ्या झाडांची निवड करण्यात आली होती. विशेष म्हणजे, वावे गावातील सर्व तरुण आणि तरुणी दरवर्षी न चुकता अशा प्रकारच्या पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण मोहिमा राबवत असतात.

## मुरूड-नागशेतचा साईटचा रस्ता खचला

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



मुरूड तालुक्यातील शिघ्रे ग्रामपंचायत हद्दीतील नागशेत हा रस्ता पर्यटकांना येणाऱ्या जाणाऱ्या मुख्य रस्ता असुन या मुख्य रस्तावरुन पर्यटक मुरूडकडे ये-जा करित असतात परंतु, हा रस्ता मुसळधार पावसामुळे साईटचा रस्ता अचानक खचल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेमुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही मोठा धोका निर्माण होऊ शकतो. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर व कुणाल सतविडकर यांनी घटनास्थळी धाव घेत रस्त्याची पाहणी करुन रस्ता तातडीने डागडुजी करावी अशी मागणी केली आहे. तरी या ठिकाणी रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांनी गाडी सावकाश चालवावी असे आवाहन गायकर व सतविडकर यांनी केले. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्तातकडे लक्ष देऊन तातडीने रस्ता सुरळीत करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## स्मशानभूमीसाठी निधीची मागणी

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील स्मशानभूमी आरसीसी काँक्रिटीची व्हावी यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खा. श्रीरंग बारणे यांची भेट घेतली. डिकसळ येथील स्मशानभूमीत नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावेळी खा. बारणे यांनी निवेदन स्वीकारून संबंधित प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## जोहे येथे स्वच्छता जनजागृती




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून (दि. २०) जुलै रोजी जोहे-पेण येथे स्वच्छता जनजागृती मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून स्वच्छेतेची शपथही देण्यात आली. प्लास्टिक बंदीतून प्रदूषण नियंत्रण करणे शक्य असल्याचे मत कार्यक्रमाप्रसंगी त्यांनी व्यक्त केले व उपस्थित ग्रामस्थांना कापडी पिशव्यांचे वाटप देखील करण्यात आले. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून १५ ते ३१ जुलै या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता पखवाडा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आतापर्यंत ८० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून जोहे-पेण येथे स्वच्छता जनजागृती मार्गदर्शन व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले या उपक्रमाप्रसंगी कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका सुचिता म्हात्रे सहाय्यक, विराज म्हात्रे व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## ग्रीन अलिबाग ग्रुपचा वृक्षारोपणातून हरित संकल्प





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

ग्रीन अलिबाग ग्रुपच्या वतीने रविवारी (दि.१९) जुलै रोजी वेश्वी-कुरुळ येथील रसाणी टेकडी परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजात रुजविण्यासाठी हा स्तुत्य कार्यक्रम घेण्यात आला. रामनाथ येथील अलिबाग नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून करंज, पिंपळ, आवळा, उंबर या देशी प्रजातींच्या २०० रोपांची लागवड करण्यात आली. ग्रीन अलिबाग ग्रुपचा वृक्षारोपणातून हरित संकल्प करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यां पर्यावरण संवर्धनाची शिकवण मिळाली.

विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाची आवड निर्माण व्हावी, निसर्गाशी त्यांचे नाते अधिक दृढ व्हावे तसेच भविष्यात पर्यावरणाबाबत संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडावेत या उद्देशानग्रीन अलिबाग ग्रुपतर्फे हा उपक्रम मागील दोन वर्षे सातत्याने राबविण्यात येत आहे.यावेळी रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी ग्रीन अलिबाग ग्रुपच्या पर्यावरण संवर्धनासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण कार्याचे कौतुक केले. ग्रुप तर्फे सर्व मुलांना यावेळी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच झाडांचे पर्यावरणीय महत्त्व, वृक्षांमुळे पावसाचे चक्र कसे संतुलित राहते, जैवविविधतेचे संरक्षण कसे होते व पाण्याचे संवर्धन का आवश्यक आहे याविषयी मार्गदर्शन केले.

### नवरात्र उत्सव मंडळाचा सलग तिसऱ्या वर्षी उपक्रम | वीसहून अधिक तरुणांचे श्रमदान

## एकविरा देवीच्या चरणी स्वच्छतेची सेवा





**| अलिबाग | प्रतिनिधी |**

केवळ देवदर्शन करून परत जाण्यापेक्षा देवस्थान स्वच्छ ठेवणे हीच खरी देवीची सेवा असल्याचा संदेश देत नवरात्र उत्सव मंडळ, रांजणखार नाका यांनी एकविरा देवी देवस्थान परिसरात स्वच्छता मोहीम राबवून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. दरवर्षीप्रमाणे यंदाही १७ जुलै रोजी मंडळाच्या सुमारे वीस सदस्यांनी श्रमदान करत पाच पायरी परिसर तसेच शक्तीपीठ मंदिरासमोरील संपूर्ण परिसर स्वच्छ करून लखलखीत केला.

मंडळाचे सदस्य स्वच्छता करत असताना अनेक भाविकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. 'आज तुमच्याकडून आम्हाला खूप काही शिकायला मिळाले,' असे सांगत काही भाविकांनीही स्वयंस्फूर्तीने श्रमदानात सहभाग घेतला. यामुळे हा उपक्रम केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित न राहता सामाजिक जनजागृतीचाही ठरला.

मोहिमेदरम्यान नारळ, हार विक्रेते, चिक्की-फरसाण विक्रेते तसेच हॉटेल व्यावसायिकांनी कचरा गोळा करण्यासाठी गोण्या उपलब्ध करून दिल्या. या श्रमदान मोहिमेत मंडळाचे मनोज पाटील, धनंजय पाटील, समीर पाटील, शंकर पाटील, जितेंद्र पाटील, आतिश म्हात्रे, राजेंद्र पाटील, रमेश भाऊ, गंगाधर पाटील यांनी सहभाग नोंदविला.

### श्रमदात्यांना अल्पोपहाराचे सहकार्य

स्वच्छता मोहिमेनंतर श्रमदात्यांसाठी प्रधान ॲण्ड कंपनी आणि पलक ट्रेडिंग कंपनी, अलिबाग यांच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. मंडळाच्या विविध सामाजिक उपक्रमांना या दोन्ही संस्थांचे सातत्याने मोलाचे सहकार्य लाभत असल्याची माहिती मंडळाने दिली.

### ट्रस्टकडून श्रमदात्यांचा गौरव

श्रमदानानंतर शक्तीपीठ मंदिरात ट्रस्टचे सदस्य साईनाथ देवकर यांनी मंडळाच्या सर्व सदस्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. 'गेल्या तीन वर्षांपासून तुम्ही सातत्याने करत असलेले श्रमदान आम्हालाही प्रेरणा देणारे आहे,' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

### सामाजिक कार्याची समृद्ध परंपरा

नवरात्र उत्सव मंडळाने आजपर्यंत रक्तदान, श्रमदान, पूरग्रस्तांना मदत, विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप, अन्नदान, पाणपोई व्यवस्थापन आणि वृक्षारोपण अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवेचा वसा जपला आहे.

## निवडक



### शाळेत ओळख रानभाज्यांची उपक्रम

**पाली** : वाघोशी शाळेत विद्यार्थ्यांना रानभाज्यांची ओळख व्हावी व त्यांचे आरोग्याच्या दृष्टीने असणारे महत्त्व समजावे या हेतूने ओळख रानभाज्यांची या उपक्रमाचे शनिवारी (दि. १८) जुलै रोजी आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने टाकळा, कुर्डू, भारंगी, अळू, शेवगा पाने या भाज्या जमा केल्या. शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवून पेपरवर लिहून भिंतीवर लावण्यात आली. दैनंदिन जीवनात रानभाज्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे यांच्या सेवनाने अनेक आजार बरे होतात. पावसाळ्याच्या सुरुवातीला येणाऱ्या या भाज्या जंगलात उपलब्ध होतात. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा कविताताई देशमुख व सर्व सदस्य, अंगणवाडी ताई, पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेश जाधव, सुवर्णा घोडे, कीर्ती लामदाडे, जनार्दन भिलारे यांनी योग्य नियोजन केले. या उपक्रमाचे उपशिक्षणाधिकारी भोपळे, गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, केंद्रप्रमुख गणेश बैकर यांनी कौतुक केले.

### 'वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र अद्ययावत ठेवा'

**पनवेल ग्रामीण** : पर्यावरण रक्षणासाठी आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र त्वरित अद्ययावत ठेवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे. केंद्रीय मोटार वाहन नियमा अंतर्गत वाहनामधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण व त्याबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाचा थेट आणि गंभीर परिणाम मानवी आरोग्य व पर्यावरणावर होत असल्याने उच्च न्यायालयाने देखील या संदर्भात अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम आणि न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांची निर्धारीत कालावधीनंतर मान्यताप्राप्त संगणकीय प्रदूषण नियंत्रण केंद्रांमार्फत ऑनलाइन पद्धतीने प्रदूषण नियंत्रण चाचणी करून घेणे व त्याचे वैध प्रमाणपत्र सोबत बाळगणे कायदेशीररीत्या अनिवार्य आहे. सर्व वाहनमालक आणि चालकांनी जर वाहनाचे वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत् अद्ययावत नसणाऱ्या तसेच रस्त्यांवर संशयास्पद वाटणाऱ्या प्रदूषक वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाचे वायूवेग पथकांद्वारे मोटार वाहन कायद्या अंतर्गत विविध कलमांखाली कडक दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

### हरीओम चॅरिटेबलतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**तळा** : हरीओम चॅरिटेबल असोसिएशन मुंबई, वालीबेन जेठालाल छेडा परिवार व सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांच्या सहकार्याने तळा व माणगाव तालुक्यातील १५ शाळांमधील १०५० विद्यार्थ्यांना सँडल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विविध शाळांमध्ये शिकत असलेल्या गोरगरीब आदिवासी मुलांना दोन ते तीन किलोमीटर अंतरावरून पायी चालत शाळेत यावे लागते. अशावेळी त्यांना चालण्यासाठी पायात सँडलची नितांत गरज होती. हे लक्षात घेऊन महाडिक यांच्या प्रयत्नाने श्रीमती वालीबेन जेठालाल छेडा यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना सँडल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी महाडिक यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळत असलेल्या सोयीसुविधांचा लाभ घेऊन आपली शैक्षणिक प्रगती साधावी व उत्तम प्रकारे शिक्षण प्राप्त करून आपल्या आईवडीलांसह शाळेचे नाव उज्वल करावे असे आवाहन केले. याप्रसंगी कुणालजी छेडा, सनी चारला, धनजीभाई गाला, विजय नागरथ, कृष्णा महाडिक यांसह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महावितरण पक्षीरोधक यंत्रणा बसविणार



**रोहा** : मागील काही दिवसांपासून महावितरणच्या वीजवाहिन्यांवर पक्षी बसल्याने तसेच उड्डाणा दरम्यान वीज वाहिन्यांच्या संपर्कात आल्याने अनेक पक्ष्यांचा मृत्यू होत असल्याच्या घटना घडत होत्या. यामुळे पर्यावरणाची हानी होत असून काही वेळा वीज वाहिन्यांमध्ये ट्रिपिंग होऊन ग्राहकांचा वीज पुरवठाही खंडित होत असते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून वीज महावितरण कंपनीने आपल्या कार्यक्षेत्रातील महत्त्वाच्या वीज वाहिन्या व खांबांवर पक्षीरोधक यंत्रणा बसविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या यंत्रणेमुळे पक्षी वीज वाहिन्यांवर बसण्याचे प्रमाण कमी होणार असून त्यांचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे. तसेच पक्ष्यांमुळे होणारे ट्रिपिंग व तांत्रिक बिघाड कमी होऊन ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. महावितरणच्या या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळत आहे. महावितरणकडून भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण राबविण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन वीज वितरणाकडून करण्यात आले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा.
मोबाईल : ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणोली, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रमाकांत तुकाराम खांडेकर यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी उभयतांत बोलणी सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बामणोली | ३२ | ०-५२-०० | २.८९ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदीविक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २१/०७/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. अनिल दयानंद पुरो, श्रीमती मिनल अनिल पुरो, श्री नितिन दयानंद पुरो, श्रीमती निता नितीन पुरो, श्रीमती स्मिता अजित पुरो, श्रीमती साक्षी प्रसाद चोगले सर्व रा. स्वामीत्व अष्टविनायक नगर, विद्यानगर तलावाजवळ, विद्यानगर, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी सुरू केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गावठाण प्लॉट नंबर | ग्रुप ग्रामपंचायत मापगाव घर नंबर | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|---|
| मापगाव ता.अलिबाग, जि.रायगड | ३१ क्षेत्र ३०० चौ. मी | १८८ अ<br>१८८ ब<br>१८८ क | ६३० चौ. फुट<br>७२० चौ. फुट<br>४६२ चौ. फुट |

सदर वर नमुद गावठाण मिळकतीमधील ग्रामपंचायत मापगाव येथील घर मिळकती

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे. तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले

अलिबाग
दिनांक : २१/०७/२०२६

स्वाक्षरीत /-
**ॲड. सविता शं.पिंगळे**
सृष्टी बिल्डींग, दुसरा मजला, वेध शाळेसमार
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ. मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| साजिदा शाहिद मस्ते. | १३१/९/अ/१० | २०३-०० | २०-३० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २१/०७/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता.कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.दया मधुकर ढेबे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| काळकाईवाडी ता.रोहा | ४३/३ | ८-६२-००<br>पो.ख. ०-४७-००<br>एकुण क्षेत्र ९-०९-०० | १३.३२ |

वर नमुद मिळकतीमधील सौ.दया मधुकर ढेबे यांच्या मालकीचे खाते क्र. ४४ क्षेत्र ३-२२-०० हे. आर., पो.ख. ०-२७-०० हे.आर., एकुण क्षेत्र ३-४९-०० हे.आर., आकार ४.१९४ रु. पैसे या मिळकतींपैकी क्षेत्र २-००-०० हे.आर., इतके क्षेत्र या साठेकराराचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबीची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०/०७/२०२६

**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा. बुरुमखाण, वरसोली,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रक्रियेद्वारे खालील कामासाठी खुल्या निविदा एक पाकीट बोली प्रणालीअंतर्गत निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव**: उप मुख्य अभियंता/कार्य/रत्नागिरी विभागांतर्गत इंदापूर, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, सावर्डा, कामथे, अंजणी, कळंबणी बुद्रुक, दिवाणखवटी, राजापूर रोड, वैभववाडी व खारेपाटण रोड स्थानकांवर एफआरपी फिल्टर युनिट उपलब्ध करून देणे. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एफआरपी-18-2026, दिनांक: 21.07.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु.14,70,000/- (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 29.07.2026. **ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्याची अंतिम तारीख/वेळ**: 12.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: 4 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी **https://www.ireps.gov.in** संकेतस्थळास भेट द्या. शुद्धिपत्र / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे वाटपपत्र/ करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजुर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | उलवे ६५० | गव्हाण ३२६/३६५ | ११४/५ | ०-९-६ | ८०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ७A, सेक्टर-२२, क्षेत्र-७९९.७२ चौ.मी. | मुळ भूधारक कै. दत्तात्रेय धर्मा ठाकूर (मयत) यांचे वारस १) श्रीमती हौसाबाई दत्तात्रेय ठाकूर, २. श्री. रणधीर दत्तात्रेय ठाकूर, ३.श्री. निलेश दत्तात्रेय ठाकूर ४.श्रीमती ललीता सुनिल पाटील | -- |
| | | गव्हाण ३२६ | ११५/P<br>११७/५ | ०-२७-८<br>०-१२-६ | | | | |
| | | गव्हाण ८ | ११२/३ | ०-३-५ | | | | |
| | | वहाळ १३ | २४८/६ | ०-८-१ | | | | |
| | | वहाळ ३०५A | ३८७/३ | ०-२९-० | | | | |
| २ | करंजाडे १२४ | करंजाडे १२३ | ३९अ/० | ०-३६-५ | ३०० चौ.मी. | मौजे उलवे, सेक्टर २२, भूखंड क्र. ११/१, क्षेत्र २९९.८५ चौ.मी. | मुळ भूधारक कै. दत्तू हाशा भगत मयत यांचे वारस १) कै. गणा दत्तू उर्फ बाळू भगत यांचे वारस १.१) श्रीमती. सुनिता गणा भगत, १.२) श्री. अस्मित गणा भगत, १.३) श्रीमती. अस्मिता महेश पाडेकर उर्फ अस्मिता गणा भगत २) श्रीमती.वनिता कैलास म्हात्रे ३) श्री. सुबोध बाळाराम ठोंबरे ४) श्रीमती. हर्षला हनुमान खुटले ५) श्री. संतोष अनंता पाटील ६) श्रीमती. सुनिता नामदेव पाटील ७) श्रीमती. ताराबाई शंकर खुटले | निरंक |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-३६-५** | | | | |
| ३ | रोडपाली | ५० | ५१/२ | ०-०२-३ | प्रत्येकी ४० चौ.मी. | भूखंड क्र. ६अ/३क, सेक्टर २०, क्षेत्र ४० चौ.मी. कळंबोली नोड | पुसुबाई चिंध्या घरत उर्फ फसुबाई मंगळ्या थळे | निरंक |
| ४ | रोडपाली १४४ | ३अ/१० | १२१/६ | ०-२१-० | ५०० चौ.मी. | भूखंड क्र. ६ए/३एच, सेक्टर २०, क्षेत्र ५० चौ.मी. कळंबोली नोड | **कै. गोमा गण्या पाटील(मयत)** यांचे वारस श्री. रामदास गोमा पाटील (मयत) यांचे वारस १.१)श्रीमती पार्वती रामदास पाटील, १.२)श्री अरुण रामदास पाटील १.३)श्री. राम रामदास पाटील २)कै.चंद्रकांत गोमा पाटील(मयत) यांचे वारस २.१)श्रीमती सुमती चंद्रकांत पाटील २.२)श्री.विलास चंद्रकांत पाटील २.३)श्री. महादेव चंद्रकांत पाटील | निरंक |
| ५ | | ५५ | ४३७/१३५ | ०-१९-० | | | | |
| | | | ४३७/१७५ | ०-०५-० | | | | |
| | | | ४३७/१८३ | ०-१२-१ | | | | |
| ६ | तळोजा १००९+ १०११ | १/२००८ | २५२/१-७ | ०-३१-० | ४५० चौ.मी. पात्रतेपैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र. २६अ, सेक्टर ९, क्षेत्र १५० चौ.मी. | दिवाणी दावा क्र.रे.मु.क्र.-३७४-२०२१, मधील न्यायालयीन आदेशानुसार वादी श्री. दत्तात्रेय बाबुराव कदम यांचे १/३ हिस्स्याप्रमाणे त्यांना इरादित भूखंड क्र. २६अ, सेक्टर-९, क्षेत्र १५० चौ.मी. | -- |
| | | | २५०/१७ | ०-२१-० | | | | |
| | | | **एकुण क्षेत्र** | **०-५२-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/१५४/२०२६-२७**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कामासाठी खुली ई-निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव**: एसएसई/ रत्नागिरी विभागांतर्गत टर्नआउट्सचे ओव्हरहॉलिंग, ट्रॅकवरील तण साफसफाई, जंगल साफसफाई, साइड ड्रेन खोलीकरण इत्यादी काम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-23, दि. 21.07.2026. अंदाजित किंमत**: रु.89,85,320/-. **ईएमडी**: रु.1,79,700/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 11.08.2026 रोजी15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी, प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी येथील कार्यालयाशी संपर्क साधावा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)

RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ५३] गुरुवार, जुलै ९, २०२६/आषाढ १८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/ सी आर /२९/ २०२१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस /११/२०१४ / सी आर / ७७ / अ२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यास यापुढे "सदर अधिसूचना" असे संबोधले जाईल) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ३ पोट-कलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ ( झअ ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल ;

त्याअर्थी, सदर अधिसूचना अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, उप जिल्हाधिकारी ( भूसंपादन ), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांनी यापूर्वी अधिसूचना क्र. भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/सी आर-२९/२०२१, दि. ०७/०७/२०२३ अन्वये कलम ११ ची अधिसूचना व अधिसूचना क्र. भूसंपादन/टे-८/कळंबुसरे/एसआर २९/२०२१/२०२६, दि. १४ मे २०२६ अन्वये कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उपरोक्त अधिसूचनेतील जमीन चिरनेर, आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी आवश्यक असलेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी त्यांचेकडील पत्र क्र.सां.बा.वि. पनवेल/रेशा/कळंबुसरे बाह्यवळण/२५१७, दि.०१/०७/२०२६ अन्वये कळविण्यात आली आहे. त्यामुळे परिशिष्ट १ मध्ये नमूद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी, सदर कायद्याचा कलम ११ उप- कलम ( १ ) अन्वये अधिसूचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते ;

त्याअर्थी, परिशिष्ट - ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. आणि त्याअर्थी, परिशिष्ट- ४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे ;

आणि त्याअर्थी, परिशिष्ट - ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उप कलम( १ )अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे ; त्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उप-कलम ( ४ ) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाहीः

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उप कलम ( ५ ) व भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट्र ) नियम, २०१४ चे कलम १० उप नियम ( ३ ) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भुमि अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल ;

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उप कलम ( ग ) अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन असल्याने उप जिल्हाधिकारी ( भूसंपादन ), मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांच्या वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट - १**

गावाचे नाव :- कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड

| अ.क्र. | स.नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | ३८/३ ई | ०-०३-४२ |
| २ | ३८/६ पै | ०-००-०९ |
| ३ | १३/६ पै | ०-००-४० |
| ४ | ३/३ पै | ०-००-८८ |
| ५ | ३/४ पै | ०-००-४९ |
| ६ | ३/५ पै | ०-००-०१ |
| ७ | ४ पै | ०-००-८२ |
| | **एकूण** | **०-०६-११** |

**परिशिष्ट - २**

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**प्रकल्पाचे विवरण** :- मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे** :- मौजे कळंबुसरे, ता. उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये-जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट - ३**
**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

**परिशिष्ट - ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा :- महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग ४-अ, दि. १३ जून २०२३ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

**परिशिष्ट - ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम ( १ ) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन ), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**नोट.**— प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप जिल्हाधिकारी ( भूसंपादन ), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

उरण,
दिनांक ९ जुलै २०२६.

**आविशकुमार सोनोने,**
उप जिल्हाधिकारी ( भूसंपादन ),
मेट्रो सेंटर क्र. १, उरण.

# स्पेन विश्वविजेता!





| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

स्पेनने फिफा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनावर विजय मिळवला. आपल्या मजबूत बचावासाठी ओळखल्या जाणाऱ्या स्पेनने गतविजेत्यांना १२० मिनिटांच्या खेळात जखडून ठेवले होते.

९०+२ मिनिटाला इंझो फर्नांडेझला लाल कार्डमुळे मैदानाबाहेर जावे लागले आणि अर्जेंटिनाला १० खेळाडूंसह पुढील ३० मिनिटे संघर्ष करावा लागला. २० प्रयत्नांनंतर स्पेनला १०६ व्या मिनिटाला गोल करण्यात यश मिळाले.२०१० नंतर पहिले वर्ल्ड कप जिंकण्यासाठी मैदानावर उतरेल्या स्पेनने गतविजेत्या अर्जेंटिनाला पहिल्या हाफमध्ये कडवी टक्कर दिली. भक्कम बचावासाठी ओळखल्या जाणाऱ्या स्पेनने पहिल्या ४५ मिनिटांत अर्जेंटिनाकडे चेंडू फारकाळ टिकूच दिला नाही आणि गोल करण्याच्या संधीपण त्यांना निर्माण करू दिल्या नाही. स्पेनचा संघ अधिक आक्रमक राहिला आहे. लामिने यमालला सामन्याच्या सुरुवातीलाच एक संधी मिळाली होती, पण दिबू मार्टिनेझने ती वाचवली.

पिवळे कार्ड मिळाल्यानंतर ४४ व्या मिनिटाला लिसांद्रो मार्टिनेझ दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेला आणि त्याच्या जागी निकोलस ओटामेंडी मैदानात उतरला. पण, अर्जेंटिनासाठी हा खूप मोठा धक्का होता. सेंटर-बॅक लिसांद्रो मार्टिनेझ याला, बचाव भेदून पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या मिकेल ओयार्झाबालला खाली पाडल्याबद्दल पिवळे कार्ड मिळाले होते. स्पेनकडून दुसऱ्या हाफची सुरुवात आक्रमक झाली. बायनाने लांबून गोलजाळीच्या दिशेने एक जोरदार शॉट मारला. मार्टिनेझने खाली वाकून तो शॉट उत्तमरित्या अडवला.

अर्जेंटिनाचा खेळ खूपच रफ होताना दिसला आणि परिणामी ५२ व्या मिनिटाला लिआंद्रो पॅरेडेसला पिवळे कार्ड मिळाले. ५५ व्या मिनिटाला स्पेन आणखी एकदा गोल करण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता, परंतु चेंडूला अंतिम दिशा देण्यात ते कमी पडले. अर्जेंटिनाच्या बचावफळीला स्पेनने कामाला लावले होते. त्यामुळे त्यांची अधिक चिडचिड झालेली दिसली. ६४ व्या मिनिटाला स्पेनकडून पुन्हा ऑन टार्गेट प्रयत्न झाला.

९०+२ मिनिटाला इंझो फर्नांडेझला सामन्यातील दुसरे पिवळे कार्ड मिळाले आणि परिणामी रेड कार्डमुळे त्याला मैदान सोडावे लागले. अर्जेंटिनाला उर्वरित सामन्यात १० खेळाडूंसह खेळावे लागले. ९३ व्या मिनिटाला निको विलियम्सने हेडरद्वारे केलेला प्रयत्न मार्टिनेझलने झेप घेत अडवला. ९६ व्या मिनिटाला विलियम्सने गोल केला होता, परंतु रेफरीने तो नाकारला. कारण फॉरवर्डने गोल करण्यापूर्वी ओटामेंडीवर मेरिनोने केलेल्या फाऊलमुळे हा गोल नाकारला. १०३ व्या मिनिटाला स्पेनचा गोल थोडक्यात हुकला.

फेरान टोरेसने लेफ्ट फूटेड गोल करून स्पेनला १-० अशी आघाडी मिळवून दिली. बार्सिलोनाच्या खेळाडूने अप्रतिम गोल केला! पेड्रो पोरोने मारलेल्या क्रॉसवर निको विलियम्सने उत्कृष्ट हेडर मारून चेंडू टोरेसच्या दिशेने पाठवला, आणि त्यानेही अप्रतिम फटका मारून चेंडू थेट जाळीच्या वरच्या भागात धाडला. टोरेसने ११३ व्या मिनिटाला आणखी एक गोल केला, परंतु तो ऑफ साईडमुळे नाकारला गेला. ११५ व्या मिनिटाला विलियमला गोल निर्माण करण्याची आयती संधी होती, परंतु स्पेनच्या खेळाडूकडून चूक झाली. १२० व्या मिनिटाला अर्जेंटिनाने बरोबरीच्या गोलची संधी गमावली.

### अर्जेंटिनाच्या नावे नकोसा विक्रम

अर्जेंटिनाचा गोलरक्षक इमिलियानो मार्टिनेझ याचे कौतुक करावे तेवढे कमी, त्याने ९० मिनिटांच्या खेळात १५ ऑन टार्गेट प्रयत्न अडवले. तेच अर्जेंटिनाकडून एकही गोलसाठी प्रयत्न झाला नाही. वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्या ९० मिनिटांत एकही गोलप्रयत्न न करणारा अर्जेंटिना पहिला संघ ठरला.

## अर्जेंटिना चारीमुंड्या चीत

### गोल्डन बूट एम्बापेचा!



फिफा वर्ल्ड कप स्पर्धेत स्पेनच्या संघाने टीम स्पीरटच्या जोरावर फायनलमध्ये गत चॅम्पियन अर्जेंटिनाला पराभूत केले. अतिरिक्त वेळेतील गोलच्या जोरावर स्पेनने दुसऱ्यांदा वर्ल्ड कप स्पर्धेचे जेतेपद पटकावले. विजेतपदाबरोबरच स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कारांवरही स्पेनच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. फायनल न खेळतानाही सर्वाधिक गोल करण्यासाठी दिला जाणारा गोल्डन बूट पुरस्कार फ्रान्सचा स्टार किलियन एम्बापे याने आपल्या नावावर केला.



### फायनलमधील मॅन ऑफ द मॅच पुरस्कार

टोरेस अंतिम सामन्यात ओयारजाबालच्या जागी मैदानात उतरला. त्याने पेड्रो पोरोच्या क्रॉसवर निको विल्यम्सच्या हेडरने मिळालेला चेंडू गोलपोस्टमध्ये पोहोचवला. तो कोणत्याही विश्वचषक अंतिम सामन्यात विजयी गोल करणारा दुसरा बदली खेळाडू ठरला.

### बक्षीस वितरणावेळी डोनाल्ड ट्रम्प यांचा अपमान?



फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत विजेत्या संघाने केलेल्या एका कृतीची जगभरात चर्चा सुरू आहे. विजेत्या स्पेनच्या संघाला विश्वचषक प्रदान केल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मंचावरच उभे राहिलेले दिसत आहेत. यादरम्यान, विजेतपदाचा जल्लोष करण्यासाठी उत्सुक असलेल्या स्पेनच्या संघाचा कर्णधार त्यांना मंचावरून जाण्यास सांगताना आणि हाताने बाजूला करताना दिसत आहे. त्यानंतरही बाजूला उभ्या राहिलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांना फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फॅन्टिनो यांनी अखेरीस मंचावरून खाली नेले.

## निवडक

### ८० सेकंदांत पाकिस्तानचा खेळ खल्लास!



**नवी दिल्ली :** भारताचा दिग्गज कुस्तीपटू आणि एमएमए मिक्स्ड मार्शल आर्ट्स फायटर संग्राम सिंगने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा भारताला गौरव मिळवून दिला आहे. संग्रामने १९ जुलै रोजी मलेशिया येथील क्वालालंपूर येथे झालेल्या भारत पाकिस्तान हायव्होटेज लढतीत पाकिस्तानच्या मोहम्मद आबिद अलीला अवघ्या १ मिनिट २० सेकंदात नॉकआउट करत प्रतिष्ठित स्ट्राइक एशिया चॅम्पियनशिप जिंकली. संग्रामने सुरुवातीपासूनच लढतीवर पूर्णपणे वर्चस्व गाजवले आणि पहिल्या फेरीतच जोरदार अटॅक करून आपल्या प्रतिस्पर्ध्याला सावरण्याची कोणतीही संधी दिली नाही. या विजयासह, त्याने प्रोफेशनल एमएमएमध्ये आपला अपराजित विक्रम कायम ठेवला आणि भारतीय मिक्स्ड मार्शल आर्ट्सच्या इतिहासात आणखी एका अविस्मरणीय कामगिरीची नोंद केली. या विजयासह तो आशियाई एमएमए चॅम्पियन बनणारा पहिला भारतीय ठरला आहे. लढत सुरू झाल्यानंतर अवघ्या ३० सेकंदांत संग्रामने योग्य संधी साधत प्रतिस्पर्ध्यावर हल्ला केला.

### इंग्लंडने भारताला २७ धावांनी हरवले




**नवी दिल्ली :** इंग्लंडने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा २७ धावांनी पराभव करत तीन सामन्यांची मालिका २-१ ने जिंकली. लॉर्ड्सवर प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ५० षटकांत ३८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताला ५० षटकांत केवळ ३६० धावाच करता आल्या. रोहित शर्माने १३८ धावा केल्या, पण त्याला विजय मिळवता आला नाही. ३८८ धावांचा पाठलाग करताना, भारतासाठी रोहित शर्मा आणि कर्णधार शुभमन गिल यांनी १४७ धावांची भागीदारी केली. गिल ७८ चेंडूंत ७७ धावा करून बाद झाला. त्यानंतर रोहितने विराट कोहलीसोबत दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी केली. रोहितने आपल्या खेळीत १११ चेंडूंत १७ चौकार आणि ५ षटकारांसह १३८ धावा केल्या. विराट कोहलीनेही आपल्या खेळीत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ६० चेंडूंत ७४ धावा करत अर्धशतक झळकावले. तत्पूर्वी, इंग्लंडकडून बेन डकेटने १३५ चेंडूंमध्ये १४१ धावा केल्या. जेकब बेथेलने ९१ धावा केल्या. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १९२ धावांची भागीदारी केली.

### टी २० वर्ल्डकप २०२८ स्पर्धा
### १२ संघ ठरले, ८ संघ पात्रता फेरीतून

**नवी दिल्ली :** टी २० वर्ल्डकप २०२८ स्पर्धेचं यजमानपद ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडकडे आहे. या स्पर्धेत एकूण २० संघ खेळणार आहेत. त्यापैकी १२ संघ आधीच ठरले आहेत. तर उर्वरित आठ संघ पात्रता फेरीतून ठरणार आहेत. उर्वरित आठ संघांसाठी पात्रता फेरी आयोजित केली जाईल, असे आयसीसीने जाहीर केले आहे. टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत खराब कामगिरी करून पहिल्याच फेरीत बाहेर पडलेल्या ऑस्ट्रेलियाची थेट निवड झाली आहे. २०२८च्या टी २० विश्वचषकासाठी यजमान देश म्हणून थेट निवड झाली आहे. ऑस्ट्रेलियासोबतच न्यूझीलंडदेखील आगामी टी २० विश्वचषकाचे यजमानपद भूषवणार आहे.



त्यामुळे त्यांना स्पर्धेसाठी थेट एन्ट्री मिळाली आहे. २०२६च्या वर्ल्डकपमधील कामगिरीच्या जोरावर भारत, इंग्लंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे पात्र ठरले आहेत. बांगलादेश, अफगाणिस्तान आणि आयर्लंड यांना रँकिंगच्या आधारे तिकीट मिळालं आहे. आयसीसी टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत खेळलेले अमेरिका, नेदरलँड्स, नामिबिया, नेपाळ, ओमान, संयुक्त अरब अमिराती, इटली आणि कॅनडा यांना थेट एन्ट्री मिळालेली नाही. त्यांना या स्पर्धेत एन्ट्री घेण्यासाठी पात्रता फेरीत चांगली कामगिरी करावी लागेल.

### मेजर लीग क्रिकेट स्पर्धा
## लॉस एंजेलिस नाइट रायडर्स अजिंक्य




| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अमेरिकेत झालेल्या मेजर लीग क्रिकेट २०२६ स्पर्धेचे विजेतेपद लॉस एंजेलिस नाइट रायडर्स संघाने जिंकले आहेत. त्यामुळे ते या स्पर्धेचे नवे विजेतेपद ठरले आहे. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात नाईट रायडर्सने वॉशिंग्टन फ्रिडमला केवळ १ धावेने पराभूत केलं. हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रोमांचक झाला. या सामन्यात नाईट रायडर्सने प्रथम फलंदाजी करताना १९.४ षटकात १६४ धावाच केल्या होत्या. त्यांच्याकडून आंद्रे फ्लेचरने २७ चेंडूत ४७ धावांची खेळी केली, तर कॉलिन मुनरोने २९ चेंडूत ४० धावांची खेळी केली. मॅथ्यू ट्रॉम्पने २१ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. जाहमर हॅमिल्टनने १० धावा केल्या. या चौघांशिवाय कोणीही दोन आकडी धावसंख्या पार करू शकले नाहीत. फ्रिडमकडून बेन ड्वारशुईने ३ विकेट्स घेतल्या. यातील एक विकेटतर त्याने स्वत:च्याच चेंडूवर अफलातून झेल घेत घेतली. जेसन होल्डरने मारलेला चेंडू तो अडवायला गेला, पण त्याच्या खांद्याला चेंडू लागला आणि त्यावेळी त्याने तो चेंडू खाली पडू दिला नाही, त्यामुळे झेल झाला होता.

यानंतर १६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या फ्रिडम संघाला २० षटकात ९ बाद १६३ धावाच करता आल्या. त्यांच्याकडून कर्णधार स्मिथसह (८) मिचेल ओवन (९) आणि रचिन रवींद्र (७) यांच्या विकेट्स स्वस्तात गेल्या होत्या. पण नंतर अँड्रिस गुस (४०), निखील चौधरी (२५) यांनी डाव सावरला. तसेच नंतर ओबस पिएनारने अर्धशतक करत संघाची आशा कायम ठेवली होती. त्याने २४ चेंडूत ५३ धावा केल्या.

## एशियन ट्रॉफीसाठी हिमाचलचे ११ खेळाडू

| शिमला | वृत्तसंस्था |

हिमाचल प्रदेशचे ११ खेळाडू ‘एशियन ओपन शॉर्ट ट्रॅक स्पीड स्केटिंग ट्रॉफी-२०२६’ साठी निवडले गेले आहेत. यापैकी सहा खेळाडू शिमला जिल्ह्यातील चियोग आणि आसपासच्या भागातील आहेत, जिथे ग्रामस्थांनी स्वतः सरकारी मदतीशिवाय दोन वर्षांपूर्वी आइस ‘स्केटिंग रिंक’ तयार केले होते.आता येथे तयार झालेले खेळाडू भारतीय संघासाठी निवडले गेले आहेत.



निवडलेल्या खेळाडूंमध्ये तेजस्वी कुठियाला, रुद्रवीर गांगटा, समर्थ अत्री, दिव्यांश ठाकूर, आभास वर्मा, आद्रिक जगटा, आराध्या शर्मा, अनिरुद्ध चंदेल, शुभम ठाकूर, विख्यात कंवर आणि मोक्षा शर्मा यांचा समावेश आहे. यापैकी आभास वर्मा, आद्रिक जगटा, आराध्या शर्मा, अनिरुद्ध चंदेल, शुभम ठाकूर आणि विख्यात कंवर चियोगचे रहिवासी आहेत. रुद्रवीर गांगटादेखील चियोगच्याच आइस स्केटिंग रिंकमध्ये सराव करतो.

एशियन चॅम्पियनशिप १७ ते २० ऑगस्ट दरम्यान उत्तराखंडमधील डेहराडून येथील हिमाद्री आइस रिंकमध्ये आयोजित केली जाईल. यात भारतासह ११ आशियाई देशांतील २०० हून अधिक खेळाडू सहभागी होतील.

आइस स्केटिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रदीप कंवर आणि प्रशिक्षक रवींद्र ठाकूर यांनी याचे श्रेय परिसरातील जनतेला दिले आहे, ज्यांनी स्वतः आइस स्केटिंग रिंक तयार केला.

त्यांनी सांगितले की, सरकारी मदतीशिवाय आइस स्केटिंग रिंक तयार करणे स्वप्न पाहण्यासारखे आहे.ग्रामस्थांनी डोंगर कापून आधी सपाट मैदान तयार केले. त्यानंतर रिंक तयार करण्यात आला. त्यांनी मुलांना आणि त्यांच्या पालकांना या यशाबद्दल अभिनंदन केले.

## रोहित लॉड्सर्वर शतक ठोकणारा पहिला भारतीय

- **परदेशात सर्वाधिक वनडे शतकांचा विक्रम**
- **सर्वाधिक वयात वनडे शतक झळकावले**

| लॉर्ड्स | वृत्तसंस्था |

इंग्लंडने तिसऱ्या वनडेमध्ये भारताचा २७ धावांनी पराभव करत तीन सामन्यांची मालिका २-१ ने जिंकली. लॉर्ड्सवर रोहित शर्माने १३८ धावांची खेळी केली. तो लॉर्ड्सच्या मैदानावर वनडे शतक झळकावणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला.



रोहितचे हे इंग्लंडच्या भूमीवरील आठवे वनडे शतक होते. यासह तो एकाच परदेशी देशात सर्वाधिक वनडे शतके झळकावणारा फलंदाज बनला. त्याने आपल्या नावावर आणखी एक विक्रम नोंदवत, सर्वाधिक वयात वनडे शतक झळकावणारा भारतीय खेळाडूचा विक्रमही केला. रोहितने विराट कोहलीसोबत दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. दोघांनी वनडे क्रिकेटमध्ये २१व्यांदा १०० किंवा त्याहून अधिक धावांची भागीदारी केली. सामन्यादरम्यान एक रंजक दृश्यही पाहायला मिळाले. रोहित आपली खेळी खेळण्यासाठी शार्दूल ठाकूरची बॅट घेऊन मैदानात उतरला.

### शुभमन प्लेअर ऑफ मंथ पुरस्कार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय कर्णधार शुभमन गिल जून महिन्यासाठीच्या आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी नामांकित झाला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या भारताच्या घरच्या मालिकेत गिल जबरदस्त फॉर्मात होता आणि त्याने कसोटी व एकदिवसीय या दोन्ही प्रकारांमध्ये संघाचे नेतृत्व केले. गिलने न्यू चंदीगड येथे झालेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारताच्या डावाने मिळवलेल्या विजयादरम्यान शानदार १२६ धावांची खेळी करून केली होती.

### नगराध्यक्ष चषकमधून रायगडात जलतरणाची नवी पिढी | ८२ विजेत्यांचा गौरव; अलिबागमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रुद्राशी टेमकरची चार सुवर्णपदकांवर मोहोर; तनिष शिंदेची दुहेरी सुवर्णभरारी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

ॲक्वाटिक असोसिएशन ऑफ रायगड आणि स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने, अलिबाग नगर परिषदेच्या सहकार्याने आयोजित नगराध्यक्ष चषक जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेला रायगड जिल्ह्यातील जलतरणपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवारी (दि.१९) दिवसभर झालेल्या स्पर्धांनंतर विविध गटांतील ८२ गुणवंत जलतरणपटूंना पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. रुद्राशी टेमकरने चार सुवर्णपदकांवर मोहोर पाडली असून तनिष शिंदेने दुहेरी सुवर्णभरारी घेतली.या स्पर्धेच्या माध्यमातून नगराध्यक्ष चषक मधून रायगडात जलतरणची नवी पिढी घडत असून राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या दिशेने पाऊल पडत आहे.

विविध तालुक्यांतून आलेल्या शेकडो स्पर्धकांनी फ्रीस्टाईल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्टस्ट्रोक आणि बटरफ्लाय प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत जलतरणातील वाढती गुणवत्ता दाखवून दिली. अलिबागमध्ये आयोजित नगराध्यक्ष चषकजिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेने याच विचाराला बळ दिल्याचे चित्र रविवारी पहायला मिळाले.







स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीमध्ये गट-२ (२०१२) मधील तनिष शिंदे याने ५० मीटर फ्रीस्टाईल आणि ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये सुवर्णपदके, तर ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक आणि ५० मीटर बटरफ्लायमध्ये रौप्यपदके पटकावली. खुल्या महिला गटात रुद्राशी टेमकर हिने चारही प्रकारांत वर्चस्व राखत चार सुवर्णपदके जिंकून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यांच्यासह विविध वयोगटांतील अन्य ८२ स्पर्धकांचा गौरव करण्यात आला. पारितोषिक वितरण समारंभाला नगरसेवक अनिल चोपडा, नगरसेवक सागर भगत, नगरसेविका अश्विनी ठोसर, पोलीस निरीक्षक किशोर साळे, कर व प्रशासकीय अधिकारी श्रद्धा नवले, कर व प्रशासकीय अधिकारी प्रियांका वाघ, राष्ट्रीय जलतरणपटू व प्रशिक्षक दिलीप वैद्य तसेच प्रशिक्षक दत्ता तरे यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना नियमित सराव, शिस्त आणि क्रीडाभावना जपण्याचा संदेश दिला. जिंकणे महत्त्वाचे आहेच; मात्र सातत्यपूर्ण मेहनतीतून स्वतःला अधिक सक्षम खेळाडू बनविणे हेच खरे यश आहे, असे सांगत त्यांनी सर्व खेळाडूंना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.अलिबागमध्ये आधुनिक क्रीडा सुविधा उभारल्यानंतर त्या सुविधांचा लाभ जिल्ह्यातील खेळाडूंना मिळावा, त्यांना सातत्याने दर्जेदार स्पर्धा उपलब्ध व्हाव्यात आणि ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंनाही मोठे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने नगराध्यक्षा अक्षया प्रशांत नाईक आणि वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या पुढाकारातून अशा उपक्रमांना सातत्याने चालना दिली जात असल्याची भावना क्रीडावर्तुळातून व्यक्त करण्यात आली.

प्रशांत नाईक यांनी यावेळी सांगितले की, अलिबागमध्ये केवळ क्रीडा सुविधा उभारणे हा उद्देश नाही, तर त्या सुविधामधून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे खेळाडू घडविणे हे आमचे ध्येय आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)